रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ११९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## खोकल्याच्या औषधामुळे १२ मुले दगावली

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने दोन वर्षांखालील मुलांना कोणतेही कफ सिरप न देण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश सर्व राज्यांना दिले आहेत. कोल्ड्रिफ आणि नेक्सा डीएस या दोन कफ सिरपमुळे मध्य प्रदेश आणि राजस्थानात दोन वर्षांखालील १२ मुलांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात येत आहे. या मुलांचे मूत्रपिंड निकामी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला, असे म्हटले जात आहे. या वादग्रस्त कफ सिरपमध्ये इथिलीन ग्लायकॉल आणि डायथिलीन ग्लायकॉल हे औद्योगिक कारणांसाठी वापरले जाणारे धोकादायक घटक आढळले आहेत. यामुळे मूत्रपिंड आणि मेंदूला गंभीर नुकसान होऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे. तामिळनाडू, केरळ, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांनी या कफ सिरपवर बंदी घातली आहे.

**कृषीवल**

रायगड, सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

सी साईट रिसॉर्ट नागाव बिच येथे कामासाठी अनुभवी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक.

9422856336/9028143980

**वेधक**

### एसटी कर्मचाऱ्यांचा १२ ऑक्टोबरला मोर्चा

**मुंबई :** थकीत महागाई भत्ता, वेतनवाढ फरकाची रक्कम व इतर थकीत देणी अशी मिळून कर्मचाऱ्यांची ४ हजार कोटी रुपयांची थकीत देणी व इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली मशाल मोर्चा काढणार आहेत. एसटीच्या मुंबई सेंट्रल येथील मध्यवर्ती कार्यालयावर १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजता मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चानंतर तात्काळ एसटी कर्मचारी बेमुदत ठिय्या आंदोलन करणार आहेत. एसटीच्या स्थापनेपासून कर्मचाऱ्यांची आंदोलने सुरू आहेत. विविध मागण्यांसाठी ही आंदोलने पान २ वर

### वीज कर्मचारी जाणार संपावर

**मुंबई :** महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांचे सुरू असलेले खाजगीकरण, इतर धोरणात्मक विषय व निवृत्ती वेतन लागू करण्यासंदर्भात सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने ९ ऑक्टोबर रोजी संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रात समांतर वीज वितरण परवाने देऊ नये, महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देऊ नये, महापारेषण कंपनीमधील २०० कोटींवरील प्रकल्प टीबीसीबी माध्यमातून भांडवलदारांना देण्यास विरोध व पान २ वर

### दार्जिलिंगमध्ये भूस्खलनात १७ जणांचा मृत्यू

**दार्जिलिंग :** पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात रविवारी (दि.५) जोरदार पावसामुळे झालेल्या भूस्खलनाने मोठा विध्वंस झाला. या भूस्खलनात आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. खालच्या भागात जोरदार पावसामुळे पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. नुकसान झालेल्या भागात मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. जोरदार पावसामुळे या भागातील परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले जात आहे. सिक्किमशी जोडल्या गेलेल्या रस्त्याचा संपर्क तुटला पान २ वर

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे
# शाळांची लागली वाट

| प्रमोद जाधव |
| रायगड |

पटसंख्येअभावी बंद पडलेल्या जिल्हा परिषदेच्या तीनशे शाळांची मतदानासाठी दुरुस्ती करण्यात आली होती. यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला होता. परंतु हा खर्च आता पाण्यात गेला आहे. बंद पडलेल्या शाळा दुर्लक्षीत झाल्या आहेत. या शाळांकडे शिक्षण विभागाने पाठ फिरविल्याने आता शाळांच्या परिसरात गवत वाढले असून दारे, खिडक्या खराब होणे, भिंतीना तडे पडणे, भिंतीवरील रंग उडणे असा प्रकार होऊ लागला आहे.



**रायगड जिल्हा परिषदेच्या तीनशे शाळांच्या दुरूस्तीचा खर्च पाण्यात**

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम सुरु करण्यात आले. शाळांमध्ये वेगवेगळे अभियान घेण्यात आले. दप्तराविना शाळा, खेळता खेळता शिक्षण सारखे उपक्रम राबवण्याबरोबरच पालक, शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गावांमध्ये रॅली काढून जिल्हा परिषद शाळेचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शोधून त्यांना जिल्हा परिषद शाळेत टिकून ठेवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले. तरीदेखील जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कमी होऊ लागली. जिल्हा परिषद शाळेत शिक्षणाचा दर्जा नसल्याचा आरोप करीत अनेक पालकांनी अन्य शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. पान २ वर

**बंद शाळांचा योग्य वापर आवश्यक**

बंद पडलेल्या शाळांचा वापर फक्त निवडणुकीच्या कालावधीत केला जात आहे. इतर वेळेला या शाळा दुर्लक्षीत राहत आहेत. करोडो रुपयांचा खर्च करून जिल्हा परिषद शाळा बांधण्यात आल्या. या दुर्लक्षीत शाळांचा वापर इतर वेळेला योग्य वापरासाठी केल्यास या शाळांमधील बहर कायम टिकून राहण्याची शक्यता आहे.

## आधार नोंदणीची खिशाला झळ

**५० टक्क्यांपर्यंत दरवाढीने सर्वसामान्यांमध्ये रोष**

| रायगड | प्रतिनिधी |

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांच्या कार्यालयाने १ ऑक्टोबर २०२५ पासून आधार नोंदणी व अद्ययावतीकरण सेवांसाठी सुधारित दर निश्चित केले आहेत. या सेवांच्या शुल्कात ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला त्याची मोठी झळ पोहोचत असून दरवाढीमुळे रोष व्यक्त केला जात आहे.

आधारकार्ड भारतातील प्रत्येक रहिवासी नागरिकांसाठी सक्तीचे आहे. नवजात बालकापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येक जण आधार नोंदणी करू शकतो. आधार तपशील अद्ययावत ठेवणे देखील गरजेचे असते. आधार नोंदणी व अद्ययावतीकरणाच्या सेवांमध्ये मात्र १ ऑक्टोबरपासून मोठी वाढ केली. विद्यार्थी, शेतकरी, लाडक्या बहिणींसह सर्वसामान्य नागरिकांना त्याचा चांगलाच आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. नवीन दर ३० सप्टेंबर २०२८ पर्यंत लागू असतील. नवीन आधार नोंदणी ही पूर्वी प्रमाणे मोफत आहे. ५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक अद्ययावतीकरण देखील मोफत ठेवण्यात आले. इतर बायोमेट्रिक अद्ययावतीकरणाचे शुल्क आता १२५ रुपये करण्यात आले आहे. पूर्वी ते १०० रुपये होते. पान २ वर




## वाहतूक कोंडीची साडेसाती प्रवाशांच्या मुळावर

**पोलिसांची दमछाक; माणगावपासून लोणेरे बाजूकडे ४ किमीच्या रांगा**

| माणगाव | प्रतिनिधी |

दसऱ्याच्या सुट्टीनंतर कोकणातून परतीच्या प्रवासाला निघालेल्या हजारो पर्यटकांमुळे रविवारी (दि.५) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. विशेषत: महाडकडून माणगावच्या दिशेने वाहनांची लांबलचक रांगा ३ किलोमीटरपर्यंत लागल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. दिवसभर उन्हात अडकलेल्या वाहन चालकांनी आणि प्रवाशांनी संताप व्यक्त केला.



शनिवार-रविवारी सुट्टीचा शेवटचा दिवस आणि दसऱ्यानंतर कोकणवासीय तसेच पर्यटक मुंबई, पुण्याकडे परतीच्या प्रवासाला निघाल्याने महामार्गावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात झाली होती. ही वाहतूककोंडी माणगावकर तसेच पर्यटक व कोकणवासी यांच्या चांगलीच मुळावर आली आहे. ती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांची चांगलीच दमछाक झाली.

काही ठिकाणी सुरू असलेले रस्त्याचे काम, वळणांवरील अरुंद मार्ग आणि काही वाहनांचे बिघाड यामुळे कोंडीची तीव्रता आणखीनच वाढली. माणगाव शहराजवळील व इंदापूर परिसरातील बायपासची कामे अपूर्ण असल्याने या शहरावर वाहतुकीचा ताण पडत आहे. त्यामुळे दिवसभर वाहनांची मोठी गर्दी झाली होती. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी व महामार्ग वाहतूक पोलीस सकाळपासूनच रस्त्यावर उतरले होते. वाहनांना पर्यायी मार्गाने वळवणे, मोठ्या वाहनांना थांबवणे आणि वाहतुकीचे नियमन करणे या कामात पोलीस दिवसभर गुंतले होते. मात्र वाढत्या गर्दीमुळे त्यांची अक्षरशः दमछाक झाली.

काही ठिकाणी वाहनचालकांनी धीर सोडून दुहेरी रांगा केल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली. यामुळे काही वेळा रस्ता पूर्णपणे ठप्प झाला. अखेर पोलीस आणि स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने सायंकाळपर्यंत कोंडी हळूहळू सैल झाली.

दरम्यान, पान २ वर

## पाण्याच्या प्रवाहात उंबर्डीतील ११ वर्षीय मुलीचा मृत्यू

■ **आजी बरोबर गुरे घेऊन परतणाऱ्या चिमुरडीचा नदी पात्रात बुडून झाला अंत**

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील उंबर्डी गावच्या हद्दीत काळ नदीत शनिवारी सायंकाळी दुर्दैवी घटना घडली. अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहात ११ वर्षीय मुलगी वाहून तिचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास अश्विनी गेनु ढेबे (वय ११, रा. गडले दुधवान, ता. मुळशी, जि. पुणे) ही आपल्या आजीसोबत गुरे आणण्यासाठी शेतात गेली होती. ती गुरे घेऊन परतत असताना उंबर्डी येथील काळ नदीचे पात्र ओलांडत होती. त्याचवेळी परिसरात अचानक पावसाचा जोर वाढला आणि नदीतील पाण्याचा प्रवाह वेगाने वाढल्याने अश्विनीचा तोल जाऊन ती पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली.

ग्रामस्थांनी तात्काळ तिला शोधल्यानंतर ती मुलगी बेशुद्ध अवस्थेत मिळाली. तिला माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारा दरम्यान पहाटे १.४० वाजता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची माहिती दगडु चायु कोकरे (वय ३०, रा. उंबर्डी) यांनी पोलिसांना दिली. त्यानुसार माणगाव पोलीस ठाण्यात या घटनेची अकस्मित मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स.ई जाधव हे अधिक तपास करीत आहेत.

या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सुर्यवंशी यांनी भेट देऊन पाहणी केली.

## अलिबागमध्ये बच्चू कडूंची हक्क यात्रा

■ **९ ऑक्टोबरला कार्यकर्त्यांकडून होणार जय्यत स्वागत**

■ **जनशक्ती पक्षाचे सचिन साळुंके यांनी दिली माहिती**

| माणगाव | प्रतिनिधी |

प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे हक्क यात्रेच्या निमित्ताने येत्या ९ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे येणार आहेत. त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी करण्यात आली असून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहणार असून तसे नियोजन करण्यात आली असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सचिन साळुंके यांनी माणगाव येथे रविवारी (दि.५) घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

यावेळी पत्रकार परिषदेत माहिती देताना सचिन साळुंके यांनी सांगितले की, प्रहार संघटना मेंढपाल, शेतकरी, मच्छिमार, दिव्यांग यांच्या सामाजिक प्रश्नासंदर्भात काम करीत आहे. संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी या सर्व प्रश्नांसाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात हक्क यात्रा काढली असून या हक्क यात्रेला सर्व जिल्ह्यातून उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला आहे. आता ही हक्क यात्रा रायगडात येत आहे. पान २ वर

## महामार्गाच्या भूमीपूजन समारंभात मंत्री गोगावले यांना डावलले

| इंदापूर | प्रतिनिधी |

गेली ११ वर्ष रखडलेल्या माणगाव आणि इंदापूर बाह्यवळण रस्त्यांची काम आता पुन्हा सुरू होणार आहेत. शुक्रवारी दोन्ही कामांचा भूमीपूजन समारंभ पार पडला. मात्र या कार्यक्रमातही राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या वादाची किनार पहायला मिळाली. कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवर तसेच बॅनरवर शिवसेनेचे मंत्री मंत्री भरत गोगावले यांना स्थान देण्यात न आल्याने, गोगावले यांना पुन्हा डावलल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे रायगड जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातील वाद थांबण्याची चिन्ह दिसत नसल्याचे दिसून येत आहे.

काही दिवसांपूर्वी राज्य सरकारच्या निधीतून उभारण्यात आलेल्या रोहा शहरातील नाट्यगृहाचा उद्घाटन सोहळा पार पडला होता. या सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेतही मंत्री भरत गोगावले यांना स्थान देण्यात आले नव्हते. गोगावले यांनी यावर संताप व्यक्त करतांना राजशिष्टाचार न पाळणाऱ्या रोहा नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीमधील पुन्हा एकदा ताणले गेले होते.

याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी पार पडलेल्या बाह्यवळण रस्त्यांच्या भूमीपूजन समारंभात पुन्हा एकदा मंत्री भरत गोगावले यांना डावलण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. गेली अकरा वर्ष रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम रखडले आहे. इंदापूर आणि मांणगाव येथील बाह्यवळण रस्त्याची कामे अपूर्ण अवस्थेत पडून आहेत. त्यामुळे इंदापूर आणि माणगाव पट्ट्यात वारंवार वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते आहे. ही बाब लक्षात घेऊन आता नवीन ठेकेदार नेमून ही कामे पूर्ण केली जाणार आहेत. नवीन ठेकेदारांच्या नियुक्तीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुढाकार घेत या दोन्ही बाह्यवळण रस्त्यांच्या भुमीपूजन समारंभाचे पान २ वर

## अध्यक्षपदासाठी शिंदे गटात रस्सीखेच

**सोशल मिडीयामध्ये एकमेकांची स्पर्धा**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी अलिबागपासून महाडमध्ये शिंदेगटात रस्सीखेच सुरु झाली आहे. आमदार दळवी यांच्या पत्नीसह राजा केणी आणि रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांचे सुपूत्र विकास गोगावले यांचे नाव घेतले जात आहे. अध्यक्ष पदावरून होणाऱ्या अंतर्गत कलहाचे वादळ सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे.

रायगड जिल्हयात महायुतीमधील शिंदे गट विरुध्द अजित पवार गट यांच्यामध्ये पालकमंत्री पदासह विकासकामांच्या श्रेयवादावरून कलगीतुरा जगजाहिर आहे. रोजगार हमी मंत्री भरत गोगावले गेल्या पाच वर्षापासून पालकमंत्री पदाचे स्वप्न पाहत आहेत, परंतु त्यांचे ते स्वप्न पूर्ण होत नाही, असे चित्र असताना दळवी विरुध्द तटकरे वाद आता विकोपाला गेला आहे. दोन्ही पक्षातील कार्यकर्ते एकमेकांची उणीधुणी काढण्यामध्ये मग्न आहेत. खड्डेमय रस्त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अपघाताचे सत्र वाढत आहे. मात्र जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, साळाव, तळेखार, अलिबाग, पेण मार्गावरील खड्ड्यांवर पान २ वर

**स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार** | **पर्यटकांसह स्थानिकांची प्रतीक्षा संपली**

## अखेर जंजिरा किल्ल्याचे दरवाजे उघडले

| आगरदांडा | प्रतिनिधी |

पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेसाठी मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याचे दरवाजे बंद करण्यात आले होते. रविवारी (दि.५) महिन्यांनी पुरातत्व विभागाने किल्ल्याचे दरवाजे पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांच्या हस्ते उघडण्यात आले. त्यामुळे पर्यटकांची व स्थानिक व्यवसायिकांची प्रतीक्षा आता संपली.



ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी जेट्टी, खोरा बंदर, दिघी बंदरावरुन पर्यटकांची ने आण केली जाते. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक भागातुन दरवर्षी लाखो पर्यटक ये-जा करतात. पर्यटकांना शिडाच्या बोटीमधुन प्रवास करताना एक वेगळाच आनंद मिळत असुन जास्तीत जास्त पर्यटक शिडाच्या बोटीत बसणे अधिक पसंत करतात. पर्यटकांच्या आगमनामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असून व्यवसायिकांची आर्थिक परिस्थिती भक्कम होण्यास मदत होते.

पावसाळ्यामध्ये किल्ल्याच्या अवती भवती पाच ते सहा फुट उंचीचे गवत वाढल्याने झुडपात सरपटणारी जनावरे असू शकतात. त्यामुळे कुणालाही धोका होऊ नये, याकरीता पुरातत्व विभागाने किल्ल्याचे दरवाजे पर्यटकांसाठी उघडले नव्हते. आता संपूर्ण किल्ल्याची साफसफाई झाली असून रविवारी पर्यटकांसाठी किल्ला खुला करण्यात आला. किल्ला पाहण्यासाठी १५ वर्षाच्या आतील मुला-मुलींना शुल्क माफ असून १६ वर्षावरील प्रतिव्यक्ती २५ रुपये आकारण्यात येणार आहे. तसेच ऑनलाईन क्युआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशी माहिती पुरातत्व विभागाचे बहुद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांनी दिली.जंजिरा पर्यटक सहकारी संस्था मर्यादित राजपुरी शिडाचे बोट चालक-मालक यांनी जंजिरा किल्ल्याचे दरवाजे उघडल्याने समाधान व्यक्त केले.

> किल्ला पुन्हा सुरु झाल्यानंतर पहिले तिकिट काढण्याचा मान मिळाला. आम्ही किल्ला पाहण्यासाठी दोन दिवसांपूर्वी आलो होतो. परंतु किल्ला बंद असल्याने पाहता आला नाही. रविवारी पुरातत्व विभागाने किल्ला पाहण्यासाठी आम्हाला परवानगी दिल्याने आम्ही सर्व समाधानी आहोत.
>
> – आकाश होळकर, बारामती

## रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीने झोडपले

■ **जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस, शेतकरी, मच्छिमारांचे नुकसान**

| रायगड | प्रतिनिधी |

पाच महिन्यांपासून जिल्ह्याला पावसाने चांगलेच झोडपले आहे. पण पर्जन्यमानाची सरासरी यंदा दरवर्षीपेक्षा १६ टक्क्यांनी कमी असल्याची आकडेवारी आहे. त्यामुळे एकीकडे पर्जन्यमान घटले असले तरी अतिवृष्टीने शेतकरी, मच्छिमार, पर्यटनाला मात्र फटका बसला आहे. मे महिन्यात पडलेल्या पावसाचा आंबा बागायतदारांना मोठा फटका बसला होता. त्याचबरोबर मच्छिमारांनाही शेवटच्या मासेमारी हंगामाचा फायदा उचलता आलेला नाही. मात्र या नुकसानीची कोणतेही मोजमाप नसल्याने आर्थिक नुकसान सोसावा लागत आहे.

यंदाच्या पावसाळ्यात मोठे पूर आले नाहीत. मोठी नैसर्गिक आपत्ती आली नाही तरी पावसाळ्यात ५२३ पक्क्या घरांचे, ९२ कच्च्या घरांचे, २० झोपड्यांचे पान २ वर

| महिना | पडलेला पाऊस | सरासरी |
|---|---|---|
| मे | ४५४.९५ | १४.६७ |
| जून | ६९७.०० | १०७.१ |
| जुलै | ७६३.६ | ६३.४ |
| ऑगस्ट | ७४४.२ | ८५.०० |
| सप्टेंबर | ४२९ | १०४ |

रायगड जिल्ह्यात ९७.७४ टक्के पाऊस पडला.



**दक्षिणेपेक्षा उत्तरेत जास्त पाऊस**

यंदा दक्षिण रायगडपेक्षा उत्तर रायगडात जास्त पाऊस पडला. अलिबाग, उरण, पेण, मुरूड या चार तालक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. अलिबाग तालुक्यात सरसरीच्या १११.५ टक्के पावसाची नोंद झाली आहे. उरणमध्ये ११६.९ टक्के, पेण तालुक्यात १०१.७ टक्के तर मुरुडमध्ये १०६. ५ टक्के पाऊस पडला. पोलादपूर तालुक्यात सरासरीच्या ७२.८ टक्के कमी पाऊस पडला आहे.

**कृषीवल** | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# नवी मुंबई विमानतळाला दिबांचे नाव उद्घाटनादिवशीच जाहीर करा- शिरढोणकर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव मिळणार असल्याचे नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले असून येत्या ३ महिन्यात विमानतळाच्या नावाबाबत कायदेशीर प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच येत्या ८ तारखेला विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते पार पडणार असेल तर विमानतळाला लोकनेते दिबांचे नाव देखील याच उद्घाटन सोहळ्यात मोदींनी केले पाहिजे आणि त्यानंतर ३ महिने सोडा पण ३ वर्षे कागदपत्रांची कामे करत बसा, असा इशारा वजा मागणी उद्योजक विजय शिरढोणकर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केली.**




फुंडे येथे प्रकल्पग्रस्तांच्या राखीव भूखंडावर स्व. लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने ५ एकर जागेत अभियांत्रिकी महाविद्यालय उभारून याठिकाणी स्व. लोकनेते दि. बा. पाटील त्यांचे स्मारक देखील स्वखर्चाने उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, ज्या वेळी आपल्या पनवेल तालुक्यातील गावे ही विमानतळ बाधित होणार होता, त्यासाठी सिडकोच्यावतीने सर्व्हे करण्यात आला. त्याचवेळी लोकनेते दि. बा. पाटील हे हयात असतानाच पहिले विमानतळाला दिबांचे नाव लावले गेले पाहिजे अशी भूमिका आम्ही मांडली. माझे वडील नामदेव शिरढोणकर हे दिबांच्या अगदी जवळचे सहकारी होते, त्यामुळे मलाही १८ वर्षे दिबांच्या सहवासात काम करण्याचे भाग्य लाभले. ज्या पद्धतीने माझ्या वडिलांकडून दिबांच्या नावासाठी लागेल तेवढा निधी आपल्या वडिलोपार्जित जमिनीमधून उपलब्ध करून दिबांच्या नावासाठी काहीतरी कर, अशा सूचना मिळाल्या, त्यावेळेपासून मी फुंडे गावच्या हद्दीतील प्रकल्पग्रस्तांसाठी मिळालेल्या ५ एकर जागेत प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांच्या नावाने अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याचे ठरविले होते.

विजय शिरढोणकर यांना केलेल्या पहिल्या मागणीला यश मिळाल्याबाबतची त्यांची भावना विचारली असता, त्यांनी विमानतळ मागणीसाठी दिबांच्या नावाचा उल्लेख केला होता, ती बाब समोर आणताना सदरबाबत स्व. लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने प्रस्तावित विमानतळ व्हावे ही मागणी सन २००८ साली केली. माझ्या मागणीचा विचार करून नागरिकांनी अनेक प्रकारची आंदोलने केली.

या आंदोलनाची दखल अखेर विमानतळ प्राधिकरण, सिडको कार्यालय, राज्य सरकारला घ्यावीच लागली. तद्नंतर स्थानिक प्रकल्पग्रस्तांचा जनआक्रोश पहिल्यानंतर सरकार देखील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव येत्या ३ महिन्यात देणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. तसेच येत्या ८ ऑक्टोबर रोजी विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्याहस्ते होणार असेल तर याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विमानतळाचे नाव जाहीर करावे, आणि काय कायदेशीर प्रक्रिया आहे ती पुढे सुरु ठेवावी, अशी मागणी विजय शिरढोणकर यांनी केली आहे.

## ऑनलाईन गुंतवणूक डॉक्टरला भोवली

पनवेल : शहरातील एका हॉस्पिटलमधील डॉक्टरला ऑनलाइन गुंतवणुकीच्या प्रलोभनातून तब्बल ३ कोटी ३२ लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. या प्रकरणात आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथे राहणारे ५७ वर्षीय डॉक्टरनवी मुंबईतील एका प्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना शेअर मार्केटमधील गुंतवणुकीसंबंधी एक जाहिरात दिसली. या जाहिरातीला घुलताना डॉक्टरने आयपीओ ट्रेडींगमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांना व्हॉट्सॲपवर लिंक पाठवण्यात आली. २२ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत विविध खात्यांमधील तब्बल ३ कोटी ३२ लाख रुपये काढण्यात आले. पण नफ्याचे ५० लाख रुपये काढण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना पैसे काढता आले नाहीत. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**● तरुणास अटक**

**। पनवेल । प्रतिनिधी।**

अंबरनाथमध्ये राहणाऱ्या एका तरुणाने अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची व त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहून प्रसूत झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर तळोजा पोलिसांनी अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तरुणाविरोधात बलात्कारासह पॉक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

पीडित मुलगी आणि आरोपीमध्ये गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंध होते. या प्रेम संबंधातूनच आरोपी तरुणाने गत फेब्रुवारी महिन्यामध्ये पीडित मुलीला फिरायला जाण्याच्या बहाण्याने तिला अंबरनाथ येथून मोटारसायकलने तळोजा येथील बहिणीच्या घरी नेले. त्यानंतर त्याने पीडित मुलीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली. पीडितेने लैंगिक अत्याचार आणि गरोदर राहिल्याची माहिती आपल्या आई-वडिलांना सांगितली नाही. पीडितेच्या पोटात दुखू लागल्यावर ती गरोदर असल्याचे कुटुंबीयांना समजले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर पीडिता प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. प्रेमसंबंधातून हा प्रकार घडल्याचे केल्यावर कुटुंबीयांनी उल्हासनगर हिललाइन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी तरुणाविरोधात बलात्कारासह पॉक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी तळोजा पोलिसाकडे वर्ग केला आहे.

पान १ वरून

## आधार नोंदणीची खिशाला झळ

'डेमोग्राफिक' अद्ययावत आधार केंद्रामध्ये किंवा ऑनलाइन ७५ रुपये, जे पूर्वी ५० रुपये होते. पत्याचा पुरावा, ओळखीचा पुरावा, दस्तऐवज अद्ययावत आधार नोंदणी केंद्रामध्ये किंवा पोर्टलवरील शुल्क आता ५० ऐवजी ७५ रुपये आकारण्यात येत आहे.

ई-केवायसी, आधार शोध व रंगीत प्रिंट दर सुद्धा ३० वरून ४० रुपयांवर नेण्यात आले. या वाढलेल्या दरामुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. ५० रुपयांचे शुल्क थेट ७५ रुपयांवर नेऊन शुल्कामध्ये ५० टक्क्यांपर्यंत, तर १०० रुपयांवरून १२५ रुपये शुल्क आकारत २५ टक्क्यांपर्यंत दरवाढ केली. या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

**सुधारित दराचे फलक लावणे बंधनकारक**

सुधारित दरांचे फलक आधार केंद्रावर दर्शनी भागावर स्पष्टपणे लावणे केंद्र चालकांना बंधनकारक करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर २०२५ पासून सुधारित दरानुसारच शुल्क आकारले जात आहे. नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क आकारल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक व जिल्हा प्रशासनाच्या सूचनांचे पालन बंधनकारक असल्याच्या सूचना देखील दिल्या आहेत. नागरिकांनी आधार केंद्र चालकाविरुद्ध तक्रार असल्यास संबंधित तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील आधार शाखा येथे तक्रार दाखल करता येणार आहे.

## अध्यक्षपदासाठी शिंदे गटात रस्सीखेच

बोलण्यास त्यांना वेळच नाही, असे चित्र आहे. जिल्हा परिषद अखत्यारित येणारे पाच हजार किलो मीटरचे रस्ते खड्डेमय आहेत. गावे, वाड्यांमधून प्रवास करताना प्रवाशांना प्रचंड त्रास होतो. महामार्गावरील रस्त्यांची देखील तीच अवस्था आहे. मात्र जिल्हा परिषद अध्यक्ष पदावरून सध्या शिंदे गटात जोरदार रस्सीखेच सुरू आहे.

शिंदे गटातील आमदार दळवी यांचे समर्थकांनी सोशल मिडीयावर मानसी दळवी यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले आहे. सोशल मिडीयावर जाहीरातबाजीदेखील त्यांच्या समर्थकांनी सुरु केली आहे. दुसऱ्या बाजूला दळवी यांचे जवळचे राजा केणी यांच्या समर्थकांकडून राजा केणी यांचे नाव अध्यक्षपदासाठी घेतले जात आहे. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे समर्थक देखील विकास गोगावले यांचे नाव अध्यक्ष पदासाठी घेत आहेत. महाडमध्ये विकास गोगावले यांनी स्वतःला आधीच अध्यक्ष घोषित केले आहे. दिलीप भोईर यांना प्रवेशावेळी अध्यक्ष पदाचे वचन दिल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे.

## रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीने झोडपले

नुकसान झाले. १२ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले, तर चार जणांचा मृत्यू झाला. तसेच पावसाने दोन हजार १८५ हेक्टर क्षेत्रावरील भातशेतीचे नुकसान केले

मॉन्सूनच्या कालावधीवरून नोंद

१ जून ते ३० सप्टेंबर हा मॉन्सूनचा कालावधी समजला जातो. शासनाकडे चार महिन्यांच्या मॉन्सूनचा पाऊस म्हणून नोंद केली जाते. या चार महिन्यांमध्ये रायगड जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान तीन हजार १४८.६ मिलिमीटर आहे. जिल्ह्यात ३० सप्टेंबरपर्यंत २६२६.८ मिलिमीटर पाऊस नोंदला गेला. वार्षिक सरासरीच्या ८३.७ टक्के पाऊस पडला आहे. यंदा चार महिन्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या १६ टक्के कमी पाऊस पडला आहे.

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शाळांची लागली वाट

त्यामुळे पटसंख्येत दिवसेंदिवस घट झाली. वीस पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला. जिल्ह्यातील ३०० शाळा बंद करण्याची वेळ जिल्हा परिषद शिक्षण विभागावर आली. गेल्या पाच वर्षापासून या शाळा बंद स्थितीत आहेत. फक्त निवडणुकीच्या कालावधीत मतदान केंद्र म्हणून या शाळेला नवा साज चढविण्याचे काम केले जाते. परंतु इतर वेळेला मात्र शिक्षण विभागाचा साधा कर्मचारीदेखील फिरकत नसल्याचे चित्र आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन, कर्जत या सात विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबरला होते. मतदान केंद्र सुसज्ज असणे आवश्यक होते. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करून त्यांचा मतदान केंद्र म्हणून वापर करण्यात आला होता. शाळांमधील परिसर स्वच्छ करण्याबरोबरच मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी बंद शाळांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत करण्यात आले होते. बंद पडलेल्या दुर्लक्षीत शाळा मतदानामुळे पुन्हा बोलक्या झाल्या होत्या.

गरज सरो आणि वैद्य मरो अशी अवस्था बंद पडलेल्या जिल्हा परिषद शाळांची झाली आहे.मतदानाची पूर्ण झाल्यावर या शाळांकडे पाठ करण्यात आली आहे.त्यामुळे या शाळा दुर्लक्षीत झाल्या आहेत. पुन्हा शाळेच्या परिसरात गवत वाढण्यापासून, दारे खिडक्या खराब झाल्या आहेत. भिंतीवरील रंग उडू लागले आहे. त्यामुळे शाळा ओसाड झाल्या आहेत.लाखो रुपयांचा दुरुस्तीवर झालेला खर्च पुन्हा एकदा वाया गेला आहे.

## वाहतूक कोंडीची साडेसाती प्रवाशांच्या मुळावर

नागरिकांनी महामार्गावरील अपुऱ्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दरवर्षी सुट्ट्यांच्या काळात अशीच परिस्थिती निर्माण होते, तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नाही, अशी टीका प्रवाशांनी केली. महामार्गाचे काम झपाट्याने पूर्ण करून बायपास रस्ते लवकर सुरू करण्यात यावेत, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. वाहतूक कोंडीमुळे कोकणातून परतणाऱ्या हजारो वाहनांना माणगावात अनेक तासांचा अतिरिक्त प्रवास सहन करावा लागला. महामार्गावरील ही कोंडी सुट्टीच्या हंगामात प्रशासनाच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे.

## महामार्गाच्या भूमीपूजन संमारंभात मंत्री गोगावले यांना डावलले

आयोजन शुक्रवारी केले होते. खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते होणाऱ्या या सोहळ्याला मंत्री आदिती तटकरे आणि भाजपचे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र मंत्री भरत गोगावले यांना या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले नव्हते. त्यामुळे पुन्हा एकदा गोगावले यांना डावलल्याची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस वाद यामुळे आणखिन विकोपाचा जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान या कार्यक्रमासाठी भाजपचे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांना निमंत्रित करण्यात आले असले तरी त्यांनी कार्यक्रमापासून दूर राहणे पसंत केले. तर मंत्री आदिती तटकरेही गैरहजर राहिल्या.

## अलिबागमध्ये बच्चू कडूंची हक्क यात्रा

बच्चू कडू ९ ऑक्टोबरला अलिबागला येत असून संघटनेतर्फे त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी करण्यात येणार आहे. यावेळी अलिबाग येथे बच्चू कडू यांच्या हस्ते संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचेही साळुंके यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला प्रहार दिव्यांग संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष सुनील घनमोडे, रोहा तालुकाध्यक्ष महेबुब अत्तार, माणगाव - तळा तालुकाध्यक्ष नरेश साळवी, जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग डांगरेकर, महाड-पोलादपूर तालुकाध्यक्ष फैज हुर्जक आदींसह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## वीज कर्मचारी जाणार संपावर

महापारेषण कंपनीचा भागभांडवली बाजारात आयपीओच्या माध्यमातून लिस्टिंग करू नये, महानिर्मिती कंपनीचे जलविद्युत प्रकल्पाचे बांधा, वापरा, हस्तांतरित तत्वावर खाजगीकरण करू नये, वीज कर्मचारी,अभियंते, अधिकारी यांना राज्य शासनाने मंजूर केलेली निवृत्ती वेतन योजना त्वरित लागू करावी, ७ मे २०२१ चा शासन आदेश सुधारित करून मागासवर्गीयांना पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करावे.

तसेच सेवा जेष्ठतेनुसार खुल्या प्रवार्गातूनही पदोन्नती द्यावी, तिन्ही वीज कंपन्यांतील १ ते ४ श्रेणीतील संवर्गनिहाय रिक्त पदे पदोन्नती, सरळसेवा भरती व अंतर्गत भरतीद्वारे एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या मूळ बीकेप्रमाणे भरावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नोकरीत समाविष्ट करण्याबाबत उपाययोजना करावी, महावितरण कंपनीच्या चुकीच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावाची अंमलबजावणी त्वरित थांबवावी आदी मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महावितरण कंपनीच्या पुनर्रचनेसंदर्भातील आदेश, ३२९ उपकेंद्र कंत्राटदारांना चालविण्यास देणारा आदेश, जलविद्युत केंद्राच्या खाजगीकरणाच्या निर्णयाच्या आदेशाची होळी यावेळी करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी परिमंडळ, मंडळ, विभागासमोर द्वारसभांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच तीनही वीज कंपन्यांतील कर्मचारी व्यवस्थापनाबरोबर वीज निर्मिती व पुरवठ्यावर कोणताही परिणाम न होऊ देता, व्यवस्थापनाच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित न राहता ९ ऑक्टोबर २०२५ रोजी असहकार आंदोलन पुकारण्यात येणार असल्याची माहिती कृती समितीने दिली.

## दार्जिलिंगमध्ये भूस्खलनात १७ जणांचा मृत्यू

आहे आणि सिलीगुडी-मिरिकचा थेट संपर्कही खंडित झाला आहे. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे दुधिया पूल वाहून गेला आहे. ऋषिखोला आणि पेडांग येथे भूस्खलनामुळे अनेक रस्त्यांवर वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. दार्जिलिंगमधील या आपत्तीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दु:ख व्यक्त केले आहे. राज्यातील विविध भागात होणारा जोरदार पाऊस आणि भूतानच्या वांगचू नदीची वाढती पाण्याची पातळी बंगालच्या लोकांसाठी अडचण निर्माण करू शकते. भूतानच्या अधिकाऱ्यांनी धोक्याचा इशारा दिला आहे. कारण वांगचू नदीचे पाणी धरणावरून वाहत आहे. सतत वाढणारी पाण्याची पातळी उत्तर बंगालमध्ये पूराचा धोका वाढवू शकते. भूतानने यासंदर्भात बंगाल सरकारला कोणत्याही परिस्थितीसाठी तयार राहण्यास सांगितले आहे. वास्तविक, भूतान बंगालच्या उत्तरेला आहे, त्यामुळे उत्तर बंगालमध्ये अडचणी वाढण्याची शक्यता जास्त आहे. वांगचू नदीचे खालच्या दिशेने वाहणारे पाणी बंगालच्या जलपाईगुडी आणि कूचबिहार जिल्ह्यांना प्रभावित करेल. गेल्या काही दिवसांपासून सतत होणाऱ्या पावसामुळे अनेक भाग जलमग्न झाले आहेत. भूतानच्या थिम्पू येथील राष्ट्रीय जलविज्ञान आणि हवामानशास्त्र केंद्राने धोक्याचा इशारा दिला आहे. ड्रुक ग्रीन पावर कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, ताला जलविद्युत धरणाचे दार उघडता आले नाहीत, त्यामुळे नदीचे पाणी धरणावरून वाहत आहे. ड्रुक ग्रीन पावर कॉर्पोरेशन हे जलविद्युत केंद्र भूतानमधील वांगचू नदीवर आहे, ज्याला भारतात प्रवेश केल्यानंतर रैदक म्हणून ओळखले जाते. वांगचू नदी बांगलादेशात प्रवेश करण्यापूर्वी बंगालमधून वाहते.

भूतानकडून धोक्याचा इशारा आला पण दार्जिलिंगमध्ये जोरदार पावसामुळे अनेक भाग जलमग्न झाल्यानंतर आणि भूस्खलनाला सामोरे जावे लागल्यानंतर आला. भूस्खलनामुळे सिक्किमधील रस्त्याचा संपर्क तुटला आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक अडकले आहेत. या आपत्तीत आतापर्यंत सुमारे १७ जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान खात्याने पाऊस आणि पूर यासंदर्भात रेड अलर्ट जारी केला आहे. रस्ते वाहून गेल्याने सिलीगुडी-मिरिक यांचा थेट संपर्क तुटला आहे. जोरदार पाऊस आणि पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे दुधिया पूल तुटला आहे. ऋषिखोला आणि पेडांग येथे भूस्खलनामुळे अनेक रस्त्यांवर वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांचा १२ ऑक्टोबरला मोर्चा

करण्यात आली. त्यामुळे झोपलेल्या एसटी प्रशासनाला जागे करण्यात यावेळी आगळेवेगळे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची घोषणा ६ ऑक्टोबर रोजी दादर येथे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप करणार आहेत. यावेळी एसटी कर्मचारी या आंदोलनासंदर्भातील सादरीकरण करण्यात येणार आहे. या आंदोलनासाठी राज्यातील विविध भागातून कर्मचारी येणार आहेत. एसटीच्या इतिहासात प्रथमच असे वेगळ्या प्रकारचे आंदोलन होणार असल्याची माहिती महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिली.

## रायगडातला मावळा पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला धावला

। उरण । प्रतिनिधी ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे खालापूर तालुका अध्यक्ष हरेश पाटील यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्तांकरिता स्वतःच्या घरातील धान्य व आपल्या सहकारी मित्रांकडून जीवनावश्यक वस्तू गोळा करून राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, संसद रत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात मुंबई येथे सुपूर्द केले.

प्रसार माध्यमांशी बोलताना प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी रायगड वरून आलेल्या मदतीचा उल्लेख विशेषतेने केला, रायगडमध्ये आजही माणुसकी शिल्लक आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेले शिकवण शिल्लक आहे. आलेलं प्रत्येक संकटाला सामोरे जाण्यासाठी रायगडचा मावळा छाती पुढे करतो. रायगड आपत्कालीन परिस्थितीत कधी मागे राहणार नाही असे खालापूर तालुका अध्यक्ष हरेश पाटील यांनी यावेळी सांगितले, रायगड जिल्हा अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातून मदत गोळा करण्यात आली व पक्ष कार्यालयाकडे सुपूर्द करण्यात आले.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** बापदेववाडी येथून एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या इसमाचे नाव सुनिल शिरसाठअसे असून शरीर बांधा सडपातळ, रंग सावळा, नाक सरळ, चहरा गोल, उंची ५ फुट ८ इंच, अंगात नेसुन पिवळ्या रंगाचा हाफ बाहयांचा शर्ट त्यावर हिरव्या पानांचे चित्र, भाषा मराठी बोलतो, या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो. शिपाई लक्ष्मण वारगुडे मो.नं. ७२७६६०१४२२ यांच्याशी संपर्क साधावा.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बाबासाहेब लीगल पँथर या संघटनेच्या माध्यमातून चौक मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल, चौकच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास बाबासाहेब लेकर पँथरचे अध्यक्ष प्राध्यापक प्रफुल्ल भोसले, उपाध्यक्ष ॲड. नीलम भोसले, संघटनेचे सचिव शशिकांत सातपुते, कोषाध्यक्ष कृणाल कदम व विभागीय समन्वयक सतीश कर्डक यांनी प्रमुख पाहुणे म्हणून सप्रेम भेट दिली.




चौक मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉक्टर सचिन सोनवणे व स्वरांजली गायकवाड यांचे स्वागत करून केलेल्या कामगिरीबद्दल कौतुक व प्रशंसा केली. यावेळी मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

## सभापती आरक्षण सोडतीसाठी विशेष सभा

**। रायगड । अलिबाग ।**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडून पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब असाधारण क्र.३१७ दि.९ सप्टेंबर २०२५ मधील ग्राम विकास विभागाची अधिसूचना क्र. जिपनि-२०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२, दि.९ सप्टेंबर २०२५ नुसार रायगड जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील १५ पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण अडीच वर्षाच्या कालावधीकरिता खालील प्रवर्गाप्रमाणे निश्चित करुन देण्यात आले आहे.

अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ० आहे. अनुसूचित जातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे.

अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे. अनुसूचित जमातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या २ आहे. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या २ आहे.

सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ४ आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ४ आहे. तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे दि.९ सप्टेंबर २०२५ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे १५ पंचायत समित्यांचे सभापती आरक्षण निश्चित करण्यासाठी जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता विशेष सभा अयोजित करण्यात आली आहे.

## अपघाताने तरुणाचे जीवन उद्ध्वस्त

**पनवेल :** वडील रिक्षाचालक, त्यात तरुण मुलाला विजेचा धक्का बसल्याने आंधळे कुटुंब हतबल होऊन शासनासह स्वयंसेवी संस्थांकडून मदतीची अपेक्षा करीत आहे.

पनवेलच्या चिपळे गावात आंधळे कुटुंब वास्तव्यास आहे. बारावीची परीक्षा दिल्यानंतर रोजंदारीवर एका मंडप डेकोरेटरकडे काम करीत असताना १७वर्षांचा शुभम आंधळे याला विजेचा धक्का बसला. एमजीएम रुग्णालयात शंभर दिवसांपेक्षा जास्त उपचार घेतल्यानंतरही तो कोमात आहे. वडिलांना हातभार लागावा म्हणून १ मे रोजी तो कामावर गेला, त्याच दिवशी दुर्दैवी घटना घडली.

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मालक श्री. बलराम छबीराज यादव वगैरे यांचेकडून सदर शेती स्वरूपाच्या मिळकती विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १३० | ४/ब | ००-५३-०० पो.ख. ००-०३-०० एकुण ००-५६-०० | २-९४ |
| १० | १२ | ००-३३-०० पो.ख. ००-०१-०० एकुण ००-३४-०० | ०-३१ |

वरील तदंगभुत हक्कहितसंबंध सुध्दा.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

ता. ०६/१०/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योजना अनिल शिंदे उर्फ**
**ॲड. सौ.योजना मनिष सुर्वे**
रा.श्रीनाथ अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३०२,
तिसरा मजला, भैरवनाथ मंदीरासमोर,
मुद्रे(बु.), कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.

# अभियानाच्या माध्यमातून जनजागृती

## बँक ऑफ इंडिया रायगड विभागाचा स्तुत्य उपक्रम

| प्रमोद जाधव |
| रायगड |

सध्या रोखीतील व्यवहारापेक्षा ऑनलाईन आर्थिक व्यवहारांत वाढ होत आहे. मात्र, अनेकांची आर्थिक फसवणूक होण्याच्या घटना देखील वाढत आहेत. त्यामुळे डिजीटल फसवणूक रोखण्यासाठी बँक ऑफ इंडिया रायगड विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यांनी जिल्ह्यात बँकेमार्फत सतर्कता जागृत अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांशी संवाद साधून त्यांना जागृत ठेवण्याचे काम सुरु केले आहे.



रायगड जिल्ह्यात लॉकडाऊननंतर ऑनलाईन आर्थिक व्यवहारावर भर देण्यात आला आहे. घरबसल्या मोबाईलच्या एका क्लीकवर रुपयांची देवाण-घेवाण होत आहे. बँकेचे कामकाजदेखील डिजीटल झाल्याने नागरिकांना मोबाईलवर बँकेची सर्व माहिती उपलब्ध होते. त्याचाच फायदा घेत काही मंडळी नागरिकांची डिजीटल फसवणूक करत आहेत. त्यामुळे डिजीटल फसवणूक रोखण्यासाठी बँक ऑफ इंडिया रायगड विभागामार्फत सतर्कता जागृत अभियान सुरु करण्यात आले असून हे अभियान १७ नोव्हेंबरपर्यंत सुरू असणार आहे.

डिजीटल फसवणूक कशा पद्धतीने होते, त्याची माहितीदेखील या सभेच्या माध्यमातून दिली जात आहे.

> आर्थिक व्यवहार डिजीटल व्हावेत, अशी शासनाची भुमिका आहे. त्यानुसार सर्व आर्थिक व्यवहार ऑनलाईन होत आहे. आर्थिक व्यवहार डिजीटल होत असताना त्याची जागृकता नागरिकांमध्ये कायमच रहावी, त्यासाठी सतर्कता जागृत अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील शाखांद्वारे सभा घेऊन डिजीटल फसवणूकीची माहिती देण्याचे काम करण्यात आले आहे. हा उपक्रम जनतेसाठी फायदेशीर ठरणार आहे.
>
> – विजयकुमार कुलकर्णी, जिल्हा अग्रणी प्रबंधक

झोनल मॅनेजर दीपन्विता साहनी व डेप्युटी झोनल मॅनेजर भरत सहाय यांच्या मार्गदर्शनानुसार बँक ऑफ इंडिया रायगड झोनतर्फे ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध शाखांच्या शाखा व्यवस्थापकांद्वारे सभा आयोजित करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, रायगड विभागातील येणाऱ्या सर्व शाखांनी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी ग्रामसभा आयोजित केली होती. या सभेला ग्राहकांकडून तसेच जिल्ह्यातील नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. बँक ऑफ इंडिया ही सार्वजनिक क्षेत्रातील मोठी बँक असून रायगड जिल्ह्याची अग्रणी बँक म्हणून ओळखली जात आहे. आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार होत असताना ग्राहकांमध्ये ऑनलाईन आर्थिक व्यवहाराची माहिती देखील देण्याचे काम केले जात आहे.

### ग्राहकांमध्ये जागरूकता करण्याचे काम

ग्राहकांना फसवणुकीशी संबंधित माहिती देऊन जागरूक करण्याचे काम केले जात आहे. ओटीपी शेअर करू नका, एटीएम पिन आणि सायबरलिंक शेअर करू नका, जास्त व्याज असणारे कर्ज घेऊन कर्जाच्या विळख्यात अडकू नका, असे आवाहन ग्राहकांना केले जात आहे.

# शेकापच्या रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

| खोपोली | प्रतिनिधी |

खोपोली शहरातील बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणासाठी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन येथील समर्थ मंगल कार्यालयात करण्यात आले होते. या मेळाव्याला ५००हून अधिक उमेदवारांनी हजेरी लावली होती. या मेळाव्यात बहुसंख्यक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. तसेच, नोकर पात्र ठरलेल्या तरुण-तरूणींना नियुक्तिपत्रे देण्यात आली आहेत.



या रोजगार मेळाव्याचे आयोजन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा महिला अध्यक्षा शिवानी जंगम, कर्जत-खालापूर विधानसभा अध्यक्ष संतोष जंगम, तालुका चिटणीस किशोर पाटील, जिल्हा नेते रविंद्र रोकडे, माजी नगरसेवक किशोर पानसरे, कैलास गायकवाड, जगन्नाथ ओव्हाळ, कय्यूम पाटील, शहर खजिनदार जयंत पाठक, राजू अभाणी, दिनेश गुरव, संजय पाटील, दिलीप पोरवाल, शांताराम पाटील, प्रसाद पाटिल, भूषण कडव, प्रविण लाले, संतोष पाटील यांच्यासह शेकापक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अतुल म्हात्रे म्हणाले की, पेण विधानसभेची निवडणूक लढविताना ५ हजार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस होता. निवडणुकीत यश आले नसले तरी विधानसभा मतदारसंघात नव्हेतर उत्तर रायगड मतदारसंघातील सर्व तालुक्यातील युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. १६ रोजगार मेळाव्यातून ३ हजार तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे शेकाप राजकीय उद्दीष्ट ठेवून काम करीत नाही, असे अतुल म्हात्रे यांनी सांगितले.

# कामोठे स्मशानभूमीत चिमणीची मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसवून या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था करण्याची मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी पनवेल पालिका आयुक्तांकडे केली आहे.

कामोठे प्रभागातील सेक्टर १५ येथे संपूर्ण कामोठे शहरा करिता एकच स्मशानभूमी असून ही स्मशानभूमी दाट लोकवस्तीच्या मध्यवर्ती भागात आहे. त्यामुळे या ठिकाणी पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर धुराचा त्रास सभोवताली राहणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यानमळे या स्मशानभूमीमध्ये धुराची चिमणी बसवणे आवश्यक आहे. तसेच, या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळेस मोठी समस्या निर्माण होते. त्यामुळे या ठिकाणी विद्युत व्यवस्था वाढवणे आवश्यक आहे. या मागणीचे पत्र माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी पालिका आयुक्त यांना दिले आहे.



# शरद पवार गटाकडून पुरग्रस्तांना मदत

| रसायनी | प्रतिनिधी |

राज्यात पावसाने थैमान घातले होते. विशेषतः मराठवाड्यात पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले आहे. त्याठिकाणी घराबरोबर शेती तसेच अनेकांच्या संसारासह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य वाहून गेले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपत्तीग्रस्त यांना मदत करण्याचे आवाहन केले आहे. त्याअनुषंगाने खालापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष हरीश पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांकडून कपडे, जीवनावश्यक वस्तू व निधी जमा करून तो प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे सुपुर्द केला आहे. यावेळी जिल्हा अध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्ह्यातील नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** पाडेघर येथे चंदन कुमार यांनी ट्रक (एमएच-१५-जेडब्ल्यू-७६६५) वॉशिंग सेंटरमध्ये धुण्यासाठी आणला होता. यावेळी चंदन कुमार यांनी जासई येथील शंकरलाल यादव (३६) याला मदतीसाठी बोलावले होते. त्यावेळी शंकरलाल यादव हा कंटेनरचा मागचा दरवाजा उघडण्यासाठी गेला असता पाठीमागील ट्रक (एमएच-४६-एच-०५३५) ने त्याला धडक दिली. आणि त्यात धडकेत शंकरलाल याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रकचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात शुक्रवारी (दि.३) गुन्हा दाखल करण्यात आला.

# माथेरान स्टेशन व्यवस्थापन कमिटीची बैठक

| माथेरान | प्रतिनिधी |

हेरिटेज वास्तू असणाऱ्या माथेरान रेल्वे स्टेशनमध्ये पर्यटकांना भेडसावत असलेल्या समस्या, त्याचप्रमाणे स्टेशन परिसरातील स्वच्छते बाबतीत महत्वपूर्ण विषयांवर व्यवस्थापन कमिटीची बैठक पार पडली. यावेळी माथेरान रेल्वे स्टेशन व्यवस्थापन कमिटीच्या सदस्यांनी स्टेशन मध्ये ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या दूर करण्यासाठी या शिष्टमंडळाने रेल्वेचे सी.सी.आई. शिरीष कांबळे यांच्या निदर्शनास आणून दिल्या.




माथेरान रेल्वे स्टेशनच्या वारसा मालमत्तेची योग्य प्रकारे दखल घ्यावी, प्रवाशांच्या बसण्यासाठी आसन व्यवस्था उपलब्ध करावी, मालवाहू बोगीची दोन टन वजनाची क्षमता असावी, पर्यटकांना सुसज्ज अशी शौचालय उभारावीत, प्लॅटफॉर्मवरील संपूर्ण भाग स्वच्छ करावा, रात्रीच्या वेळी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा, स्टेशन परिसराला संरक्षक जाळ्या बसवाव्यात, स्तनपान मातांना स्वतंत्र खोलीची व्यवस्था असावी, मिनिट्रेन फेऱ्या वाढण्यासाठी वरिष्ठांना सूचित केल्यास पर्यटन वाढण्यास मदत होईल, ऑनलाइन तिकीटांसाठी सुविधा उपलब्ध करावी, शटल सेवेमध्ये एक प्रवासी बोगी वाढविण्यात यावी आणि आजूबाजूच्या भागात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे त्याचा निपटारा लवकरच करण्यात यावा, अशा सर्व समस्या स्टेशन व्यवस्थापन कमिटीने नेरळ-माथेरान रेल्वेचे सीसीआई शिरीष कांबळे, पीएसआय सतीश कांबळे, आरपीएफ प्रमोद कांबळे यांच्याकडे मांडल्या आहेत.

# चिरनेरला विभागीय सहसंचालकांची शेतभेट

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात ठाणे विभागीय सहसंचालक शिवाजी आमले यांनी तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, पोलीस पाटील संजय पाटील, कृषी पर्यवेक्षक शुभम गटकळ, मंडळ अधिकारी शिवाजी लोहकरे, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड व सुरज घरत या सर्वांच्या उपस्थितीत गावांना नुकतीच भेट दिली. राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण तृणधान्य अभियानांतर्गत चारसुत्री पद्धतीने घेतलेल्या रत्नागिरी आठ या भात लागवड प्रात्यक्षिकाची पाहणी केली. दरम्यान, मौजे चिरनेर येथे पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती



मिशन अंतर्गत स्थापन झालेल्या श्री महागणपती सेंद्रिय शेतकरी उत्पादक गटातील शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून या गटातील शेतकऱ्यांनी तयार केलेल्या सेंद्रिय निविष्ठांची तसेच सेंद्रिय निविष्ठांचा वापर केलेल्या पिकांची प्रात्यक्षिके पाहिली. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी घेतलेल्या विविध पिकांविषयी माहिती व नवीन कृषी समृद्धी योजनांची माहिती तसेच अपुरे भांडवल व तंत्रज्ञान, कौशल्याचा अभाव, बाजारपेठेची मर्यादा, रोजगाराची निर्मिती व सामूहिक विकास याविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले.

# वाहन अडवून तिघांना मारहाण

**पनवेल :** विश्वजीत म्हात्रे हे बुधवारी (दि.१) मित्रांकडे पार्टीसाठी गेले होते. गुरूवारी पहाटेच्या सुमारास ते मित्रांसह गाडीने निघाले. ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या अलीकडील चौकाजवळ आले असता त्यांच्या गाडीला दोन कार आणि तीन ते चार मोटरसायकलने आडवले. त्यावेळी १५ ते २० जणांनी विश्वजीत म्हात्रे यांच्यासह त्यांच्या मित्राला शिवीगाळ करत धमकावले आणि विक्रम उर्फ टिंग्या याने फायबर पाईप आणि पीव्हीसी पाईपने कारच्या काचा फोडल्या. यावेळी चाकू सारख्या टोकदार वस्तूने मारहाण केली.

# ओबीसी परिषदेतर्फे धरणे आंदोलन

| उरण | प्रतिनिधी |

महाराष्ट्रातील ५२ टक्के लोकसंख्या तथा ८६१ जाती-उपजाती 'ओबीसी-व्हीजेएनटी-एसबीसी' प्रवर्गात असून त्यांच्यासाठी फक्त २७ टक्के आरक्षण आहे. त्याचा लाभ घेऊन ओबीसी समाज शिक्षण, नोकरी व राजकीय प्रतिनीधीत्व मिळवण्यासाठी धडपडत असतात. परंतु, घटनाबाह्य पद्धतीने दबाव तंत्राचा वापर करुन मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात घुसखोरी करुन महाराष्ट्र सरकार ओबीसी समाजावर अन्याय करत आहे. तर, दुसरीकडे मराठा समाज बांधवांची फसवणुक करीत आहे. शासनाच्या या चुकीच्या जीआर विरोधात वेगवेगळे ओबीसी नेते रस्त्यावरील लढाई लढत आहेत. ज्या आझाद मैदानावर २ सप्टेंबरचा जीआर दिला आहे, त्याच मुंबईच्या आझाद मैदानावर राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेच्या माध्यमातुन ओबीसींचे पहिले धरणे आंदोलन होणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर धोंडे व इतर ओबीसी नेत्यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.७) आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

### शाखा अधिक गतिमान करा | बी. एच. गायकवाड यांचे आवाहन

# बौद्ध महासभेचा वर्धापन दिन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा शाखेचा वर्धापन दिन आज उत्साहात व मंगलमय वातावरणात साजरा होत आहे. आपणा सर्वांसाठी हा एक ऐतिहासिक सोहळा आहे. संस्था वाढीसाठी योगदान सर्वांचेच कायम राहिले आहे. संस्थेचे कार्य, धोरण तळागाळातील घटकांपर्यंत पोहचवून शाखा अधिक गतिमान करा, असे आवाहन राष्ट्रीय सचिव बी.एच. गायकवाड यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा उत्तर शाखेचा वर्धापन दिन सोहळा नवीन पनवेल येथील भीमप्रेरणा सांस्कृतिक केंद्र येथे शनिवारी (दि.४) आयोजित करण्यात



आला होता. त्यावेळी गायकवाड बोलत होते.

संस्थेचे जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय सचिव बी.एच. गायकवाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केंद्रीय महिला विभाग प्रमुख सुषमा पवार, राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्य प्रभारी भिकाजी कांबळे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु.जी. बोराडे, महिला कमिटी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष स्वाती शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्षदिपक गायकवाड, जयवंत लव्हाडे, उषा कांबळे, आनंद गायकवाड, ॲड. हेमंत शिंदे आदी मान्यवरांसह जिल्ह्यातील व तालुक्यातील पदाधिकारी, बौद्धाचार्य, केंद्र शिक्षक, शिक्षिका, श्रामणेर, उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना बी.एच. गायकवाड म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभा ही राष्ट्रीय संस्था आहे. तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेली ही संस्था आहे. भारतीय बौद्ध महासभेचे देशामध्ये एक वेगळे स्थान आहे. संस्थेच्या माध्यमातून कार्यकर्ता शिबीरापासून श्रामणेर, बौद्धाचार्य शिबीर घेऊन व्यक्तीला घडविण्याचे काम केले जाते. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार संस्थेच्या माध्यमातून केला जात आहे. रायगड जिल्हा शाखेची सुरुवात खोपोलीतून झाली आहे. आज पनवेल येथे सुसज्ज अशा इमारतीमध्ये जिल्हा शाखेचा वर्धापन दिन साजरा होत आहे. संस्थेचे विचार अधिक गतीमान करून संस्था वृद्धींगत करण्यासाठी प्रयत्न करा, असे गायकवाड यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्य प्रभारी भिकाजी कांबळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन करून संस्थेचे पदाधिकारी, उपासक, उपासिकांना संबोधित केले. दरम्यान, संस्थेच्या पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

## निवडक

### रेवदंड्यात गुटख्याचे साम्राज्य

**रेवदंडा :** अनधिकृत होलसेल गुटखा धंदेवाल्याने सरकारी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन उघडपणे दहशत पसरवली आहे. त्यामुळे रेवदंड्यात गुटख्याचं साम्राज्य बिनधास्तपणे वाढत चालले आहे. त्यामुळे कायद्याचा धाक संपलाय की प्रशासनाचा मौनसंग्रह आहे, असा प्रश्न नागरिकांच्या चर्चेतून ठळकपणे पुढे येत आहे. रेवदंड्यात गुटखा माफियाने विक्रीसाठी भन्नाट शक्कल लढवली आहे. जो कोणी गुटखा विक्री करतो त्याच्या घरीच माल पोहोचवला जातो, तर काही ठराविक टपऱ्या आणि दुकानांमध्ये गुपचूप पुड्या लपवून ठेवल्या जातात. ग्राहकांना सहजा सहजी भेटणार नाही, अशा जागी हा माल दडवला जातो. गावभर हे खेळ उघडपणे सुरू असताना, स्थानिक पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.तसेच, गावात कार्यरत असलेल्या अनधिकृत होलसेल गुटखा धंदेवाल्याने दोन सरकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून थेट गावात दहशत निर्माण केली असल्याची देखील गंभीर चर्चा सुरू आहे. गुटखा विक्रेत्यांना एवढी उघड उघड मोकळीक मिळणे म्हणजे स्थानिक यंत्रणेचे मूक सहकार्य आहे की काय, असा संशय जनतेमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची कसून चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी जोरदार मागणी रेवदंड्यातील नागरिक करत आहेत.





### दातांची काळजी विषयावर सत्र संपन्न

**रोहा :** एम.बी. मोरे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शनिवारी (दि.४) लायन्स क्लब मार्फत इयत्ता १ली ते ५वीच्या विद्यार्थ्यांसाठी दातांची काळजी या विषयावर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दात स्वच्छ ठेवण्याच्या पद्धती, योग्य ब्रशिंग तंत्रे आणि दातांचे आरोग्य टिकवण्याचे महत्व समजावून सांगितले गेले. डॉ. तनुजा पवार यांनी प्रत्येक विद्यार्थ्याची दंत चिकित्सा करून उपाययोजना सुचविली .कार्यक्रमाचे उद्दीष्ट विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे होते. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थ्यांना लायन्स क्लब तर्फे टूथब्रश व टूथपेस्ट याचे वाटप करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबच्या लायन लेडी संपदा देशपांडे, सुश्मिता शितळकर, जयश्री पवार आणि डॉ.तनुजा पवार उपस्थित होत्या.



### गोविंद तळेकर यांचा सन्मान

**रायगड :** समाज कार्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल पेडली येथील गोविंद बाळाराम तळेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. त्यांना समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुधागड तालुका मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा नुकताच पार पडला. सुधागड तालुका मराठा समाज या संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये संचालकपदी कार्यरत असताना गोविंद तळेकर यांनी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी योगदान दिले आहे. केलेल्या समाजसेवेच्या बळावर संस्था दिवसेंदिवस अधिक जोमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. दसरा मेळाव्याचे औचित्य साधत सुधागड तालुका मराठा समाज या संस्थेच्यावतीने माजी संचालक व पदाधिकारी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. गोविंद तळेकर यांच्या समाज कार्याची दखल घेत त्यांना समाजगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.




### तांबाटी ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

**खोपोली :** तांबाटी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सुसज्ज इमारतीसह औजार बँक व रूग्णवाहिकेचे लोकार्पण गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनाला लोकप्रतिनिधी आणि राजकीय पुढाऱ्यांना न बोलवता अधिकारी आणि स्थानिकांच्या उपस्थित लोकार्पण सोहळा करून एक चांगला संदेश देण्याचे काम ग्रामपंचायतीने केले आहे. कोणती ग्रामपंचायत चांगली वाईट हे हिणवत नसून तुमच्यात स्पर्धा लागली तरच अशी सुसज्ज कार्यालये उभी राहतील आणि अभियनातून गावं स्मार्ट बनतील, असे मत गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी यर प्रसंगी बोलताना केले आहे. यावेळी गोदरेज कंपनीचे तानाजी चव्हाण, एमएनएस कंपनीचे किरण वैद्य, सरपंच अविनाश आमले, उपसरपंच नितीन पाटील यांच्यासह शरद कदम, अनिल जाधव, संदेश पाटील, सुरेश जाधव, प्रकश पाटील, महेश पाटील, ज्ञानेश्वर सुतार, प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

### समाजसेविका शैला तुरे यांचा गौरव

**पाली/गोमाशी :** खारपाले पेण येथील समाजसेविका शैला प्रमोद तुरे यांचा रविवारी (दि.५) 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५'ने सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन इंडियन कॉपीराईट प्रोटोक्शन मुंबई व सहकर्म सामाजिक कल्याण फाऊंडेशन यांच्यावतीने शैला तुरे यांना गौरविण्यात आले. महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान झाल्याबद्दल मित्र मंडळी तसेच आप्त आप्तेष्ट यांच्यावतीने त्यांच्या आजपर्यंतच्या सेवाभावी कार्याला मनाचा मुजरा करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



# संघाचे सोने आणि पितळ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी सध्या साजरी होत आहे. केंद्रातले सरकार व सुमारे बारा राज्यांमधील सरकारे सध्या भाजपच्या हातात असल्याने शताब्दीचा हा उत्साह मोठा असणार हे अपेक्षित होते. नरेंद्र मोदी १५ ऑगस्टच्या लाल किल्ल्यावरच्या भाषणापासून सतत संघाचा उल्लेख करीत आहेत. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी माणूस निवडण्यात संघाचा जो दबाव आहे तो कमी करण्यासाठी ही स्तुती चालू आहे की, ७५ वर्षे होऊन गेल्यावरही सत्तेत राहू दिले गेल्याबद्दल मोदींनी संघाबद्दल व्यक्त केलेली ही कृतज्ञता आहे हे सांगणे कठीण आहे. आता केंद्र सरकारने संघाच्या गौरवानिमित्त टपाल तिकिट व नाणे प्रकाशित केले आहे. पूर्वी संसदेत सावरकरांचे तैलचित्र लावण्यावरून मोठा गदारोळ झाला होता. संघासाठी नाणे काढण्याचा कार्यक्रम मात्र शांततेत पार पडला. एका अर्थाने संघाने सावरकरवादावर केलेली ही मात म्हणावी लागेल. सावरकरांनी संघावर अनेकदा टीका केली होती. तो जन्माला आला, संघात गेला आणि काहीही न करता मरून गेला एवढेच संघ स्वयंसेवकाचे वर्णन करता येईल असे सावरकर म्हणत. ऐन स्वातंत्र्य चळवळीत किंवा तेव्हाच्या राजकारणात भाग न घेण्याबद्दल संघावर केलेली ती टीका होती. पण आता तिला अर्थ राहिलेला नाही. असो. संघाची सुरुवात २७ सप्टेंबर १९२५ रोजी झालेली असली तरी संघवाले दसरा हा स्थापनादिवस मानतात. त्यानुसार यंदा दसऱ्याचे नागपुरातले संचलन व सरसंघचालकांचे भाषण जोरदार होईल अशी अपेक्षा होती. पण ते नेहमीइतकेच सामान्य झाले. किंबहुना, मोहन भागवत यांच्या भाषणातून सोने वाटले जाण्याऐवजी त्यांचे व संघाचे पितळच उघडे पडले. हिंदूंना संघटित करण्याची गरज, चारित्र्य वगैरे शब्दांची त्यात उधळण आहे. संघ ही राजकीय नव्हे तर सांस्कृतिक संघटना आहे असे म्हणायचे, पण राजकारणावर वाटेल ते मतप्रदर्शन करायचे ही संघाची नेहमीची लबाडी राहिलेली आहे. पूर्वी हेच भागवत राखीव जागा रद्द करण्याची वेळ आली आहे असेही म्हणाले होते. त्याचा तेव्हाच्या बिहार निवडणुकीत फटका बसला होता. तसे काही यावेळी ते बोलले नसले तरी ऑपरेशन सिंदूर आणि ट्रम्प यांचे आयातशुल्क यावर त्यांनी मते मांडली.

### गोल गोल बोलणे

भागवत किंवा कोणाही संघनेत्यांचे वैशिष्ट्य असे असते की ते गोल-गोल बोलत राहतात. कधीही थेट नाव घेऊन मते मांडत नाहीत. आडून आडून बोलणे ही यांची खासियत. त्यांनी सिंदूरबाबत बोलणे अपेक्षितच होते. कारण त्यात पाकिस्तानचा द्वेष करता येतो. पण हेच भागवत चीनबद्दल चकार शब्दही काढत नाहीत. चीनने लडाखमध्ये आपला प्रदेश बळकावला असल्याचे सोनम वांगचूक वगैरे स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. याच वांगचूक यांना मोदी सरकारने आता रासुका लावला आहे. चीन सरहद्दीच्या आत आला नाही असे सांगून मोदींनी यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. पण जमिनीवरील पुरावे वेगळेच सांगतात असे माजी लष्करी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. देशप्रेमाच्या गप्पा ऐकवणारे भागवत अशा गोष्टींविषयी सरकारला हडसून जाब विचारणे सोडा अप्रत्यक्षदेखील काहीही उल्लेख करत नाहीत. हीच गोष्ट ट्रम्प यांच्या धोरणांची. आयातशुल्कामुळे भारताला आता स्वदेशीचे धोरण घ्यावे लागणार आहे असे ते म्हणतात. पण मोदी तोंडदेखले स्वदेशीच्या घोषणा करत असताना स्वतः मात्र गाड्या, बूट, चष्मे, पेन सर्व काही परदेशी बनावटीचे वापरतात यावर भागवत काही बोलत नाहीत. मोदींनी चिनी वस्तूंवर बंदी घालावी असे काही ते सुचवत नाहीत. दुसरे म्हणजे अमेरिकेने भारताची जर इतकी कोंडी केली असेल तर तेथील भारतीयांनी मातृभूमीला परत येऊन इथे काम करावे असेही ते बोलत नाहीत. अमेरिकेच्या याच भारतीयांकडून संघाला भरपूर पैसे व इतर मदत मिळत असते. अमेरिकेत राहून फुकाचे देशप्रेम दाखवण्याऐवजी त्यांनी इथे यावे असे ना भागवत म्हणत, ना संघाचे संस्कार होऊनही या अमेरिकेतील संघ स्वयंसेवकांना तसे वाटत. देशात आपण बंधुभावाने राहायला हवे, इतरांच्या धार्मिक श्रध्दांचा आदर करायला हवा असे आवाहनही भागवत यांनी केले. असे करताना त्यांनी मुस्लिमांच्या श्रध्दा असे म्हणण्याचे मात्र टाळले.

### भ्रष्टाचारावर मौन

ही संदिग्धता हेच संघाचे वैशिष्ट्य आहे. उद्या संघावर कोणी संकुचितपणाचा आरोप केला की भागवतांचे हे भाषण दाखवायला ते मोकळे असतात. पण त्यात भागवतांनी मुस्लिमांच्या श्रध्दा जपायला हव्यात, त्यांना विनाकारण लक्ष्य करता कामा नये असे का म्हटले नाही असा प्रश्न संघ स्वयंसेवकांना पडत नाही. कारण हा सर्व सोईचा मामला असतो. भागवतांना बंधुभावाचे इतके जर महत्व वाटते तर डुक्करपूजेसारखे उपक्रम करून आणि वारंवार मुस्लिमांना धमक्या देऊन तेढ निर्माण करणाऱ्या नितेश राणे यांच्यासारखे जे असंख्य आगलावे लोक या देशात आहेत त्यांचा त्यांनी स्पष्टपणे निषेध केला असता. यांना मंत्रिमंडळातून काढा अशी मागणी केली असती. गोहत्येच्या नावाखाली मुस्लिमांचे खून पाडणारे हिंदू नव्हेत असे स्पष्टपणे सांगितले असते. पण भागवतांना तसे करायचेच नाही. कारण, संघाची उभारणी हीच मुळी मुस्लिमद्वेषावर झालेली आहे. चारित्र्य या मुद्द्यावरही भागवतांनी बरीच उपदेशबाजी केली. पण आज केंद्र व राज्यातील भाजपच्या सरकारांचे चारित्र्य काय आहे? तमाम दुनियाभरचे भ्रष्टाचारी, अत्याचारी लोक भाजपने जमा केले असून त्यांना मंत्रिपदे वाटली आहेत. महाराष्ट्रात तर भाजपने काहीही गरज नसताना दुसऱ्यांचे पक्ष फोडून अधर्माने सरकार स्थापन केले, पैशांचे आमिष दाखवून निवडणुका जिंकल्या व ते सतत खोटे बोलत असते. आता मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना ८५ रुपये गुंठा याप्रमाणे भरपाई देऊ केली आहे. पूर्वी विरोधी पक्षनेते असताना देवेंद्रांनी ओल्या दुष्काळाची मागणी केली होती. आता तशी तरतूदच सरकारी नियमात नाही असे ते सांगत आहेत. या खोटारडेपणाबद्दल, भ्रष्टाचाराबद्दल भागवत काहीही बोलत नाहीत. तेच देवेंद्र संघाचा गणवेश घालून संचलनात सामील होतात. दुसरे नितीन गडकरी बेफाट घोषणा करतात. पूल, धरणे, वीजप्रकल्प इत्यादींच्या बांधकामांमुळे देवभूमी म्हटला जाणारा हिमालयाचा सर्व परिसर धोक्यात आला आहे. तेथे दरवर्षी ढगफुटी, पूर, दरडी कोसळणे याने हाहाकार माजतो आहे. हा असला विकास नको असे बोलण्याचे धाडस भागवत दाखवत नाहीत. याचे कारण संघाचे नेते आता सत्तेच्या सापळ्यात अडकले आहेत. यंदा फेब्रुवारीमध्ये संघाच्या आलिशान कार्यालयांचे उद्घाटन झाले. बारा मजल्यांच्या तीन इमारती श्रीमंती रीतीने बांधण्यात आल्या आहेत. सेवा वगैरे शब्दांवर भागवतांच्या भाषणात नेहमीप्रमाणे प्रवचन दिलेले होते. पण संघाचे सहानुभूतीदार व बहुसंख्य पैसे देणारे लोक सेवा, चारित्र्य, शुचिता यापासून शेकडो कोस दूर आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून ढोल पिटले जात आहेत.

**विचार**

# संबंधातले चढउतार प्रत्ययकारी

***सातत्यपूर्ण अर्थविषयक घडामोडींमुळे भारतीय अर्थविश्वात सतत अस्थिरता पहायला मिळत आहे. अशातच भारतीय औषधांसाठी अमेरिकेचे दार बंद होऊन चीनचे दार खुले झाल्याने अर्थकारणातले राजकारण अलिकडे पहायला मिळाले. असे असले तरी एकूण ट्रम्प टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले. दरम्यान, घराची विक्री घटूनही बिल्डरांचा नफा वाढल्याचे पहायला मिळाले.***




**महेश देशपांडे**

वातावरण ढवळून काढणाऱ्या अर्थविषयक घडामोडींमुळे भारतीय अर्थविश्वात सतत अस्थिरता पहायला मिळत आहे. अशातच भारतीय औषधांसाठी अमेरिकेचे दार बंद होऊन चीनचे दार खुले झाल्याने अर्थकारणातले राजकारण अलिकडे पहायला मिळाले. असे असले तरी एकूण ट्रम्प टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले. आणखी एक लक्षवेधी वृत्त म्हणजे गेल्या काही काळात घराची विक्री घटली असली तरी बिल्डरांचा नफा वाढल्याचे पहायला मिळाले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषध उत्पादनांच्या आयातीवर शंभर टक्के आयात कर लादला. या निर्णयाचा भारतातील प्रमुख औषध उत्पादकांवर मोठा परिणाम होऊ शकतो. कारण अमेरिका ही भारतीय औषध उत्पादकांसाठी एक मोठी बाजारपेठ आहे. अमेरिकेच्या टॅरिफचा आता चीन स्वतःसाठी फायदा करून घेण्यास सज्ज झाला आहे. चीनने भारतीय औषध उत्पादनांवरील तीस टक्के आयात शुल्क पूर्णपणे माफ केले आहे. म्हणजे आता भारतीय औषध कंपन्या कोणत्याही सीमाशुल्काशिवाय चीनला औषधे निर्यात करू शकतील. या निर्णयामुळे येत्या वर्षात भारतीय औषध निर्यातीमध्ये अब्जावधी डॉलर्सची वाढ होऊ शकते. अमेरिकेने औषधांवर शंभर टक्के आयात शुल्क लादून बाजार जवळजवळ बंद केला असताना चीनकडून हा निर्णय घेण्यात आला. ड्रॅगनच्या या निर्णयामुळे भारतीय औषध क्षेत्राला दिलासा आणि नवी संधी मिळू शकते. जनरिक औषधे आणि लस जागतिक स्तरावर परवडणाऱ्या किमतीत पुरवल्या जातात. यामुळे भारताला 'जगातील फार्मसी' म्हटले जाते. आतापर्यंत चीनी बाजारात काम मिळवणे भारतीय कंपन्यांसाठी कठीण होते. कारण तीस टक्के शुल्कामुळे औषधांच्या किमती वाढायच्या; मात्र आता शून्य आयात शुल्कामुळे भारतीय कंपन्यांना चीनसारख्या मोठ्या बाजारात थेट स्पर्धा करण्याची संधी मिळेल. यामुळे केवळ निर्यात वाढणार नाही, तर जागतिक आरोग्य सेवा पुरवठा साखळीमध्ये भारताचे स्थान मजबूत होईल.


या निर्णयामुळे भारत-चीन व्यापार संबंध संतुलित होतील. सध्या भारताची आयात जास्त आणि निर्यात कमी आहे. त्याचा फायदा चीनला होत असतो. औषध उद्योगातील धुरिणांच्या मते भारतीय औषध उद्योगाला चीनचे दरवाजे खुले झाल्याने भारतात हजारो नोकऱ्या निर्माण होतील, उत्पन्न वाढेल. हा निर्णय केवळ भारताच्या अर्थव्यवस्थेसाठीच नाही, तर परवडणाऱ्या आणि विश्वासार्ह औषधांच्या जागतिक पुरवठ्यासाठीही 'गेमचेंजर' ठरू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. अर्थात दोन देशांमधील संबंध सध्या अधिक चांगले होत असल्याचे दिसत असले, तरी खरे चित्र आतून वेगळेच आहे. हा सगळा प्रकार दोन्ही देशांमधील व्यापाराशी संबंधित आहे. याबद्दल दोन्ही देशांमधील मोठ्या उद्योजकांनी अनेक गोष्टी उघड केल्या आहेत. प्रमुख ऑटोमोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, की भारत आणि चीन यांच्यातील व्यापारी संबंधांमध्ये प्रत्यक्षात काहीही सुधारणा झालेली नाही. 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या बाबतीत कोणतीही प्रगती झालेली नाही. भारतीय ऑटो कंपन्यांचे ५१ अर्ज अजूनही चीनमध्ये निर्णयाविना पडून आहेत. हे अर्ज 'हेवी रेअर अर्थ मॅग्नेट' आयात करण्यासाठी आहेत. या निर्बंधांमुळे कंपन्यांच्या व्यावसायिक योजनांना मोठा फटका बसत आहे. त्यांच्या नवीन योजना थांबल्या आहेत. त्यांना आपले काम पुढे नेण्यात खूप अडचणी येत आहेत. ही परिस्थिती त्यांच्या वाढीवर आणि विकासावरही परिणाम करत आहे. कंपन्यांना नवी उत्पादने बाजारात आणता येत नाहीत. त्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

अशीच एक दुसरी बातमी महत्वाची आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर लादला. त्यांनी अलीकडेच औषध आयातीवर शंभर टक्के कर जाहीर केला. एका अहवालानुसार, ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयांचा भारताच्या आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. 'क्रिसिल इंटेलिजेंस'च्या अहवालात म्हटले आहे, की उच्च अमेरिकन कर देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण धोका निर्माण करू शकतात. त्याचा भारतीय वस्तूंच्या निर्यातीवर आणि गुंतवणुकीवर नकारात्मक परिणाम होईल. तथापि, महागाई कमी झाल्यामुळे आणि व्याजदर कपातीमुळे देशांतर्गत वापर वाढत आहे. त्यामुळे आर्थिक विकासाला पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढ मागील वर्षापेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या ७.४ टक्क्यांच्या तुलनेत या काळातील जीडीपी वाढ ७.८ टक्के होती. नाममात्र जीडीपी वाढ गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील १०.८ टक्क्यांवरून ८.८ टक्क्यांपर्यंत घसरली.

'क्रिसिल'ने त्यांच्या अहवालात भाकित केले आहे, की ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) वर आधारित महागाई चालू आर्थिक वर्षात ४.६ टक्क्यांवरून ३.५ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. कच्च्या तेलाच्या किमती कमी होणे आणि जागतिक बिगरखाद्य महागाई कमी राहण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, कृषी क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. त्यामुळे अन्नमहागाई नियंत्रणात राहू शकते. तथापि, काही भागात मुसळधार पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे; परंतु नुकसानाचे प्रमाण अद्याप निश्चित झालेले नाही. शिवाय रिझर्व्ह बँकेने या वर्षी जूनपर्यंत रेपो दरात १०० बेसिस पॉइंट्सची कपात केली आहे. या कपातींचा बाजारावर सकारात्मक परिणाम होण्याची वाट पाहत आहे. या घडामोडींदरम्यान भारत आणि अमेरिकेतील व्यापार चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. अमेरिकन अधिकाऱ्यांनी या महिन्यात भारताला भेट दिली, त्यानंतर भारतानचे वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्या नेतृत्वाखाली एक पथक अमेरिकेला गेले होते. आतापर्यंतच्या चर्चेचे वर्णन सकारात्मक केले जात आहे. दोन्ही देशांमधील वाद लवकरच सोडवले गेले, तर त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होईल.आता एक लक्षवेधी बातमी. देशभरात 'रियल इस्टेट मार्केट'मध्ये गेल्या काही दिवसांपासून एक वेगळाच ट्रेंड पहायला मिळत आहे. घरांच्या विक्रीचा आकडा घटला असला, तरी बिल्डर मात्र मोठ्या फायद्यात दिसत आहेत. 'ॲनारॉक'या आघाडीच्या प्रॉपर्टी कन्सल्टंटच्या अहवालानुसार या वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीमध्ये (जुलै ते सप्टेंबर २०२५) देशातील सात प्रमुख शहरांमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत नऊ टक्के कमी घरे विकली गेली. आश्चर्य म्हणजे कमी विक्री असूनही बांधकाम व्यावसायिकांच्या एकूण महसुलात १४ टक्के वाढ झाली. या गणनेवरून स्पष्ट होते की बाजाराचे लक्ष सरासरी व्यक्तीकडून फक्त श्रीमंत खरेदीदारांकडे वळले आहे. 'अनारॉक'च्या आकडेवारीनुसार २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये अंदाजे ९७ हजार ८० घरे विकली गेली. २०२४ च्या याच तिमाहीमध्ये हा आकडा एक लाख सात हजार घरांपेक्षा जास्त होता. मात्र गेल्या वर्षी एक लाख ३३ हजार कोटी रुपयांच्या घरांची विक्री झाली होती. या वर्षी हा आकडा एक लाख ५२ हजार कोटींवर पोहोचला. या विरोधाभासाचे थेट कारण म्हणजे लक्झरी फ्लॅट्सची मोठी मागणी. अहवालानुसार, बांधकाम व्यावसायिक आता लहान, परवडणाऱ्या घरांऐवजी मोठे, अधिक महागडे लक्झरी फ्लॅट बांधण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. या तिमाहीमध्ये सुरू झालेल्या नवीन प्रकल्पांमध्ये एक लाख १.५२ हजार कोटींपेक्षा जास्त किमतीच्या लक्झरी घरांचा वाटा ३८ टक्के होता. अहवालानुसार, ४० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीच्या परवडणाऱ्या घरांचा वाटा सर्वात कमी म्हणजे १६ टक्के इतका आहे. याचा अर्थ बांधकाम व्यावसायिकांनी कमी फ्लॅट विकले आहेत; परंतु प्रति फ्लॅट जास्त किमतीमुळे एकूण महसूल वाढला आहे. देशात विकल्या गेलेल्या एकूण घरांपैकी मुंबई आणि पुण्याचा वाटा ४८ आहे. जवळपास सर्व प्रमुख शहरांमध्ये विक्रीमध्ये घट झाली आहे. अर्थात चेन्नई आणि कोलकातामध्ये विक्रीमध्ये वाढ झाली. दरम्यान, देशभरातील सरासरी मालमत्तेच्या किमतींमध्येही नऊ टक्के वाढ झाली. 'एनसीआर' मध्ये २४ टक्क्यांची सर्वाधिक वाढ झाली. अहवालात स्पष्टपणे दिसून आले आहे, की 'रिअल इस्टेट' बाजार एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. एकूण गृहविक्रीमध्ये घट झाली असूनही बिल्डर्सचे उत्पन्न वाढत आहे. रिअल इस्टेट बाजार श्रीमंत खरेदीदारांवर अधिकाधिक केंद्रित झाल्यामुळे मध्यमवर्गासाठी घराची मालकी एक महत्त्वाचे आव्हान बनली आहे. चेन्नई आणि कोलकातामधील विक्रीतील वाढ आणि एनसीआरमधील किमतींमध्ये २४ टक्के वाढ शहरांमधील कामगिरीमध्ये बदल दर्शवते, जे बाजारपेठेत असमान पुनर्प्राप्ती दर्शवते.

**चर्चा आजची**

# डिजीटल दरोड्यापासून सावधान!



**वैष्णवी वाडकर**

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेट हे आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्वाचा भाग बनले आहेत. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असून काही सेकंदांत जगभरातील माहिती आपल्याला मिळते. शिक्षण, नोकरी, बँकिंग, खरेदी, मनोरंजन अशा सर्व क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर होत आहे. या तंत्रज्ञानामुळे जीवन सोप्प झाले आहे, पण त्याचबरोबर आपली इंटरनेटवर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेकदा लोक जलद कमाई, आकर्षक ऑफर्स आणि नवीन गेम्सना बळी पडतात. ऑनलाईन गेमिंग हर एकप्रकारचा डिजीटल दरोडाच असून, अशा प्रकारे तंत्रज्ञानाचा उपयोग सोयीस्कर असले तरी त्याचा गैरवापर करून फसवणूक करण्याचा घटनांमध्ये वाढ होत चालली आहे.

अलिकडे ऑनलाईन गेमिंग आणि जुगाराच्या नावाखाली लाखोंची फसवणूक होण्याची घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. या ऑनलाइन जुगार आणि गेम्सच्या मोहात अडकून अनेक नागरिक आपल्या मेहनतीची कमाई पणाला लावून त्यांची फसवणूक होत आहे. अनेक गेमिंग ॲप्स आणि संकेतस्थळे फक्त एक गेम खेळा आणि पैसे जिंका किंवा लाखो रुपये कमावण्याची सुवर्णसंधी अशा जाहिराती दाखवतात. त्या गुगल प्ले स्टोअरवर किवा गूगल संकेतस्थळांवर उपलब्ध असल्याने अनेकांना या ॲप्स कायदेशीर वाटतात. पण या आकर्षक जाहिरातींच्या मागे असतात सायबर गुन्हेगारांची टोळी, जी ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून लोकांचे पैसे लंपास करते.

रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील एका घटनेतही असेच झाले. चेंढरे येथील एका व्यक्तीच्या मोबाईलवर 'ए.एम. ९९९', 'मधुर मटका', 'तीन पत्ती' अशा अनेक ॲप्सच्या जाहिराती गेल्या चार महिन्यांपासून येत होत्या. जाहिराती गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असल्यामुळे त्यांना या जाहिराती कायदेशीर वाटल्या. जास्त पैसे कमवण्याच्या हेतूने त्यांनी 'ए.एम. ९९९' आणि 'मधुर मटका' असे दोन ॲप डाऊनलोड केले आणि गुगल पे मार्फत १० हजार रुपये ॲपच्या वॉलेटमध्ये जमा केले. काही दिवसांनी त्यांना परतावा मिळालेला दिसला नाही आणि फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी १९ सप्टेंबरला सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार केली. सायबर गुन्हे शाखेने या प्रकरणात राजस्थानपर्यंत धागेदोरे शोधून काढले आणि आरोपींना अटक केली. तपासात समोर आले की, या टोळीने वेगवेगळ्या बँक खात्यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात पैशांची गफलत केली होती. काही सामान्य लोकांची खाती वापरून त्यांना बनावट कंपनीचे संचालक दाखवून शेकडो कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते.

त्यामुळे ही घटना आपल्याला सावधान राहण्याचा मोठा धडा देतात. हल्ली इंटरनेट अगदी सहज वापरता येत असले तरी त्यापासून धोकादेखील निर्माण होतो. जसे म्हणतात नाण्याचा दोन बाजू असतात तसेच काही इंटरनेटचे आहे. इंटरनेटचादेखील दोन बाजू आहेत, चांगली आणि वाईट. चांगली बाजू अशी की, इंटरनेटमुळे हवी ती माहिती, वस्तू, फोटो आपल्याला सहज मिळते. परंतु, अशाच सहज मिळणाऱ्या माहिती, वस्तूंमागे लपलेल्या असतात त्या फ्रॉड जाहिराती आणि संकेतस्थळे, ज्यात मेहनीतीने कमवेलले पैसे अगदी काही सेकंदात लंपास होऊ शकतात. त्यामूळे इंटरनेटचा वापर करताना आपण सावध राहणे खूप महत्त्वाचे आहे. कोणत्याही ॲपवर किंवा संकेतस्थळावर पैसे गुंतवण्यापूर्वी ती सुरक्षित आहे का, हे तपासावे. जलद कमाई किंवा जलद श्रीमंती या जाळ्यात अडकू नये. संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका, अनोळखी क्रमांकांवरून आलेल्या मेसेजवर किंवा फोन कॉलवर विश्वास ठेवू नका. कोणत्याही ॲप किंवा संकेतस्थळावर पैसे गुंतवण्यापूर्वी त्याची सुरक्षा आणि पारदर्शकता नीट तपासा. वेबसाइट, ग्राहकांचे रिव्ह्यूज आणि मिडियामधील उल्लेख शोधा.ॲप कोणती परवानगी मागत आहे, ते बघा. अनावश्यकपणे संपर्क, मेसेज किंवा बँकिंग परवानगी विचारणारे ॲप डाउनलोड करणे टाळा. कोणत्याही लिंकवर क्लिक करून वैत्यक्तिक व बँकिंग माहिती देणे टाळा.

त्यामुळे ऑनलाईन गेमिंग किंवा जुगाराच्या ॲप्सपासून दूर राहा आणि फसवणूक झाल्यास त्वरित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवा. इंटरनेट हे ज्ञान, शिक्षण आणि प्रगतीचं त्याच बरोबर मनोरंजनाचे साधन आहे. परंतु, त्याचा वापर सावधानतेने करणे गरजेचं आहे. सजग आणि जबाबदार नागरिक झालो, तरच आपण या डिजिटल जगात कोणतीही फसवणूक न करून घेता पुढे जाऊ शकतो. त्यामुळे डिजीटल दरोड्यापासून तुम्हीही सावध रहा आणि इतरांनाही सावध करा!

**लोकसंसद**

## ज्येष्ठ अभिनेत्री संध्या काळाच्या पडद्याआड

पन्नास साठच्या दशकात 'झनक झनक पायल बाजे', 'दो आंखें बारह हाथ', 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली', परछाईंया, 'नवरंग', 'अमर भूपाळी', 'चंदनाची चोळी अंग अंग जाळी' आणि 'पिंजरा' अशा मोजक्याच चित्रपटांमधून आपल्या निखळ आणि नैसर्गिक अभिनयाच्या आणि अप्रतिम नृत्य कौशल्याच्या जोरावर भारतीय चित्रपट सृष्टीत आपली वेगळा ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री संध्या यांच्या निधनाने एका युगाचा अंत झाला. २२ सप्टेंबर १९३२ रोजी कोची येथे जन्म झालेल्या संध्या यांचे




पूर्वाश्रमीचे नाव विजया देशमुख असे होते. १९५२ साली प्रदर्शित झालेला आणि व्ही. शांताराम यांनी दिग्दर्शित केलेला 'अमर भूपाळी' हा संध्या यांचा पहिला मराठी चित्रपट होता. मात्र भारतातील चित्रपट रंगीत होण्याच्या सुरुवातीच्या काळात बनवलेल्या 'झनक झनक पायल बाजे' या १९५५ सालच्या हिंदी चित्रपटाने त्यांना प्रचंड लोकप्रियता लाभली. बॉक्स ऑफिसवर 'सुपर हिट' ठरलेल्या या चित्रपटाला १९५५ चा सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला तसेच फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कारही मिळाला. मात्र १९७२ साली प्रदर्शित झालेल्या 'पिंजरा' या चित्रपटाने त्यांना अभूतपूर्व अशा लोकप्रियतेच्या कळसावर नेऊन ठेवले. पन्नास वर्षांनंतरही 'पिंजरा'च्या गाण्यांची जादू आजही ओसरलेली नाही. अभिनेत्री संध्या यांना भावपूर्ण आदरांजली.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## एशिया कप स्पर्धेत भारत जिंकला पण...

दुबई येथे झालेले, एशिया कप क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केल्यानंतर भारतीय संघाने




पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांकडून चषक घेण्यास नकार दिला. भारतीय संघाने चषक घेण्यास मंचावर यावे अशी अनेकदा घोषणा करूनही कोणीही गेले नाही. त्यामुळे पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांनी चषक आणि पदक स्वतः घेऊन गेले. यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने त्यांच्याकडे हा चषक भारताकडे सोपवावा अशी चेतावणी दिली आहे. भारतीय संघाने हातात चषक आहे असे भासवून एकदम मजेत आपले मनोरंजन करत होता आणि मोहसीन नक्वी यांना डिचविण्याचा प्रयत्न होता. चषक कोण जिंकले आणि कोण हक्क दाखवतोय हेच एक कोडे आहे. या सर्व प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शैलीत एक्स वर पोस्ट करत म्हटले 'ऑपरेशन सिंदूर मैदानात चालूच आहे. भारत जिंकला आमच्या क्रिकेटपटू यांचे अभिनंदन' भारतीय खेळाडूनी दाखवलेली ही धमक खरच कौतकास्पद आहेच! पण यापुढे जाऊन खेळाडूंनी पाकशी कुठेही जगात क्रिकेट खेळणार नाही अशी भूमिका घेणे हे अधिक स्वागतार्ह आहे.

**- श्री आल्हाद माळगांवकर, पनवेल**

**दिनविशेष**

## पुणे आकाशवाणी केंद्राचे सांगली हे उपकेंद्र सुरू झाले

६ ऑक्टोबर १९६३ हा दिवस महाराष्ट्रातील आकाशवाणी इतिहासात महत्त्वाचा आहे. याच दिवशी पुण्याच्या आकाशवाणी केंद्राचे सांगली उपकेंद्र सुरू झाले. त्या काळात मनोरंजनासाठी दूरदर्शन नसल्याने रेडिओच लोकांसाठी मुख्य माध्यम होते. घराघरात, हॉटेलांत आणि सार्वजनिक ठिकाणी रेडिओ लागलेला असे.

१९६३ मध्ये, लोकांना रेडिओच्या माध्यमातून नवनवीन कार्यक्रम ऐकायला मिळत होते. सांगली उपकेंद्र पुणे आकाशवाणीचेच एक उपकेंद्र होते, ज्याचे प्रसारण सुरुवातीला २४० मीटर (१२५० किलोसायकल्स) वरून केले जात होते. नंतर हे प्रसारण २३९.८१ मीटर (१२५१ किलोहर्टझ) वर बदलले. सांगलीजवळच्या तुंग येथे असलेल्या ट्रान्समीटरमध्ये कार्य सुरू झाले आणि त्यावेळी प्रसारण इतके स्पष्ट होते की ते गोवा, कर्नाटकातील काही भागांमध्येही ऐकू जात होते. या केंद्रावर जपानमधील 'निपॉन' ट्रान्समीटर वापरले जात, परंतु काही वर्षांनी देशी बनावटीचे भेलचे ट्रान्समीटर बसविण्यात आले. १९८५ मध्ये कोल्हापूर रोडवर एक नवीन आकाशवाणी स्टुडिओ इमारत बांधली गेली.

त्या सुवर्णकाळात आकाशवाणीवर मराठी साहित्यिक आणि संगीत क्षेत्रातील मोठमोठी माणसे कार्यरत होती. पु. ल. देशपांडे, मंगेश पाडगावकर, वेंकटेश माडगूळकर यांच्यासारखी साहित्यिक मंडळी नियमितपणे आकाशवाणीवर येत असत. सुधीर फडके यांचे अजरामर 'गीत रामायण' अशाच एका प्रसारणाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.मधुकर गोळवलकर यांच्या 'जयोस्तुते श्री महन् मंगले' या गीताच्या रेकॉर्डिंगवेळी संपूर्ण स्टुडिओ संगीतकार आणि गायकांनी भरून गेला होता, ज्यामुळे त्यांना बाहेरच्या पॅसेजमध्ये उभे करावे लागले होते. या गोष्टींनी आकाशवाणीची ऐतिहासिक महती सिद्ध होते.

रेडिओ फक्त एक मनोरंजनाचे साधन नव्हते; ते लोकांच्या जीवनाशी जवळून जोडलेले होते. एका गरीब वृद्ध चर्मकाराने रेडिओवर ऐकलेल्या निवेदनावरून एका निवेदकाला आपल्या हातांनी चप्पल बनवून देण्याची विनंती केली होती. ही एक घटना आहे जिच्यामुळे रेडिओच्या माध्यमातून लोकांशी कसे दयाळू आणि सखोल नाते जुळले होते, हे कळते.


पुणे आकाशवाणी केंद्राचे सांगली उपकेंद्र आजही इतिहासाच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. १९६३ चा हा क्षण मराठी संस्कृतीचा अभिमान आहे, ज्याने नवनवीन साहित्यिकांना आणि कलाकारांना एक व्यासपीठ दिले. रेडिओवर प्रसारित झालेल्या आठवणी आणि कार्यक्रम आजही अनेकांच्या मनात जिवंत आहेत.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ६ ऑक्टोबर

१) श्रीम.रोहिणी चंद्रकांत वडे थळबाजार अलिबाग, ६-१०-१९५२
२) श्री. राघव भिवा गुरव वेश्वी, अलिबाग, ६-१०-१९४६
३)श्री.लक्ष्मण नामदेव म्हात्रे मु.कोप्रोली, अलिबाग ६-१०-१९५२
४)श्री.अनिल वसंत मराठे चेंढरे, वरसोली,अलिबाग ६-१०-१९५७

## सुवर्णकण



'अपुरे राहाणे हा संसाराचा स्वभाव आहे आणि अपूर्णता जाणे हरिनामाचा स्वभाव आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# ...अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकू

## ● चिपळूण काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय महामार्ग विभागाला इशारा

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

अनेक वर्षापासून रखडलेली महामार्ग चौपदरीकरणाची कामे, निकृष्ठ गटारे व फुटपाथची झालेली दुरावस्था याविषयी चिपळूण कॉंग्रेसने येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यालयावर शुक्रवारी धडक दिली. ठेकेदारांशी हात मिळवणी करून वेळकाढू भूमिका राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. येत्या १५ दिवसात कारभारात सुधारणा न झाल्यास कार्यालयास टाळे ठोकू व वेळ पडल्यास महामार्ग रोखू, असा इशाराही यावेळी दिला.



कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षा सोनललक्ष्मी घाग व तालुकाध्यक्ष लियाकत शहा यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी अचानक राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यालयावर धडक दिली. यावेळी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या शाखा अभियंत्याना धारेवर धरले. महामार्गाच्या दुतर्फा वाढलेली झाडी व गवत किती दिवसात काढली जाईल, असा सवाल करण्यात आला. याशिवाय गटारांची कामे निकृष्ठ झालेली आहेत. अनेक ठिकाणी गटारे कोसळली असून फुटपाथवर चालणेही कठीण बनले आहे. उड्डाणपुलाचे काम अनेक महिने संथ गतीने सुरू आहे. या कामासाठी यंत्रणा वाढवून तातडीने ते मार्गी लावण्याची मागणी यापूर्वीदेखील केली होती. मात्र, त्यानंतरही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कारभारात सुधारणा झालेली नाही. दरवेळी नविन अधिकारी कार्यालयात थांबवून इतर अधिकारी फिरतीवर निघून जातात. निवेदन दिल्यानंतर मी नविन आहे, माहिती घेऊन सांगतो, अशी चालढकल करण्यात येते. मात्र, यापुढे ही बनवाबनवी आम्ही चालवून देणार नाही. ठोस कार्यवाही झाली नाही, तर जनतेला सोबत घेऊन आंदोलन छेडू.

राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांकडून केलेल्या सूचनांना ठेकेदारांकडून केराची टोपली दाखवली जात आहे. हे ठेकेदार अधिकाऱ्यांना दाद देत नसल्याचे दिसून येते. अधिकाऱ्यांचे व ठेकेदारांचे साटेलोटे असल्यानेच त्यांच्यावर कसलीही कारवाई होत नाही. वारंवार निवेदने देऊन त्याचा फरक पडलेला दिसत नाही, आता महामार्गावर आंदोलन करून थेट कृती करू, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला.

यावेळी शहराध्यक्ष संतोष सावंत देसाई, संजय जाधव, सुबोध सावंत देसाई, कबीर काद्री, यशवंत फके, कांता चिपळूणकर, डॉ. सरफराज गोठे, अजित शिंदे, लियाकत शेख, राजेंद्र भुरण, इतिखाब चौगुले, दादा आखाडे, महादेव चव्हाण, महिला तालुकाध्यक्ष निर्मला जाधव, शहराध्यक्ष विणा जावकर, सफा गोठे, नंदा भालेकर, युवक जिल्हाध्यक्ष साजिद सरगुरोह, अ.ल माळी डॉ. दिपक विखारे, अनिल रेपाळ, सुनिल खेडेकर, विनायक जाधव, सुरेश राऊत, कैसर देसाई आदी उपस्थित होते.

# 'अभिजात मराठी भाषेला संपन्न, समृद्ध वारसा'



**| खोपोली | प्रतिनिधी |**

मातृभाषा मराठीला समृद्ध आणि संपन्न वारसा आहे. प्राचीन अशी परंपरा आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे भाषा विकासाला एक नवी दिशा मिळाली आहे. आपल्या अभिजात मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी सर्वांनी भाषा विकासात महत्त्वाचे योगदान द्यावे, असे प्रतिपादन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांनी केले. संस्थेच्या के.एम.सी. महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस या उपक्रमांतर्गत आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र शासन- मराठी भाषा विभागाच्या सूचनेनुसार महाविद्यालयात मराठी भाषा व साहित्य मंडळ, सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचे संस्कार व्हावे, या हेतूने हे ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले होते. ग्रंथ प्रदर्शनात भाषा, साहित्य, कला, विज्ञान-तंत्रज्ञान, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक, इतिहास अशा विविध विषयावरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. ज्याला विद्यार्थी, पालक, शिक्षक, वाचक यांच्याकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या निबंध लेखन व प्रश्नमंजुषा स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले.

# सिक्युरिटी गार्डची हत्या

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील उलवे सेक्टर २५ एमध्ये गरबा खेळण्याच्या किरकोळ वादातून हत्या करण्यात आली. सिक्युरिटी गार्ड उदय केहरी सुद (२६) आणि एस्टेट एजंट ऋषिकेश रांजणे यांच्यात वाद सुरु झाला. यावेळी रांजणे याने जवळ ठेवलेल्या चाकूने सुदच्या पोटावर वार केला. यात सुद गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि.३) रात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली. मुख्य आरोपी ऋषिकेश रामदास राजाणे (२८) आणि त्याचा साथीदार सूरज रतनलाल जैसवाल (२५) यांना पनवेलमधून पोलिसांनी अटक केली आहे.

# एलईडी मासेमारीला पारंपरिक मच्छीमारांचा विरोध

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

एलईडी मासेमारी विरोधात पारंपरिक मच्छीमार आक्रमक झाले आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शाश्वत मच्छीमार हक्क संघाने पुढील आठवड्यात सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयावर धडक देण्याचा निर्णय संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला.

एलईडी मासेमारीमुळे पारंपरिक मासेमारी करणाऱ्या लहान नौकांना मिळणाऱ्या मासळीचे प्रमाण कमी झाले आहे. अवैध मासेमारी नजरेत येऊ नये म्हणून आता रात्रीबरोबरच दिवसाही मासेमारी केली जात आहे. मासेमारी करून या नौका संध्याकाळी राजिवडा व मिरकरवाडा जेटीवर मासळी उतरवतात. हा प्रकार पारंपरिक मच्छिमारांच्या नजरेस आला आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या या बेकायदेशीर मासेमारीवर तोडगा काढण्यासाठी शाश्वत मच्छीमार हक्क संघाची तालुका स्तरावर नुकतीच बैठक झाली. यावेळी संघाचे अध्यक्ष रणजित भाटकर यांनी सांगितले की, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुढील आठवड्यात सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयावर धडक दिली जाईल. अधिकारी या अवैध मासेमारीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत, भाटकर यांनी अधिकाऱ्यांना समुद्रात नेऊन ही अवैध मासेमारी कशी चालते, हे प्रत्यक्ष दाखवून देण्याची तयारी दर्शवली आहे.

# कांदा उत्पादकांच्या डोळ्यात पाणी



## ● भाव घसरले
## ● अतिवृष्टीमुळे पिकाचे मोठे नुकसान

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

ऐन सणासुदीच्या काळात हाती आलेले पीक अतिवृष्टीत वाहून गेल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. त्यात बाजारात पिकाच्या भावात अपेक्षित वाढ न झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक दबाव वाढला आहे. त्याशिवाय निर्यातीतील अनिश्चित धोरणांमुळे उन्हाळी कांदा चाळीत साठवून ठेवलेल्या शेतकऱ्यांचा मोठा हिस्सा नुकसानीत गेला आहे. त्यातच परदेशातील आयातबंदीमुळेही कांद्याचे भाव घसरवले आहेत.

दसरा-दिवाळीच्या हंगामात शेतकरी साठवलेल्या कांद्याची विक्री करून नफा कमावतात. सोलापूर जिल्ह्यातून दिवाळीच्या सुरुवातीला नवीन हंगामाचा कांदा मुंबई एपीएमसीत येण्यास सुरुवात होते. मात्र, यंदा सोलापूर जिल्ह्याला अतिवृष्टीचा तडाखा बसल्याने कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे यंदाचा हंगाम काहीसा लांबणीवर गेल्याचे मुंबई एपीएमसीतील व्यापारी सांगत आहेत. त्याशिवाय कृषी विभागाच्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील सुमारे ४० हजार हेक्टर कांदा पिकाला अतिवृष्टीचा फटका बसला आहे. त्यामुळे खरीप आणि लेट खरीप पिकाचे ८० टक्के नुकसान झाल्याचा अंदाज आहे. यामुळे नोव्हेंबर महिन्यापर्यंत बाजारात कांद्याची आवक कमी राहणार असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांकडून वर्तवण्यात येतो आहे.

> **सध्या बाजारात कांद्याच्या दरात घसरण झाली आहे. चांगल्या प्रतीचा कांदा बाजारात उपलब्ध नसून, पावसामुळे बराचसा माल कुजतो आहे. त्यामुळे अपेक्षित दरही मिळत नसल्याचे चित्र आहे. दिवाळीपर्यंत परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा होती. मात्र, आता अतिवृष्टीमुळे नवीन हंगामही लांबणीवर गेला आहे. दर कमी झाल्याचा फायदा ग्राहकांना जरी होत असला तरी शेतकरी आणि व्यापाऱ्यांना मात्र आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.**
> **- मनोहर तोतलानी, कांदा-बटाटा व्यापारी, एपीएमसी**

# सराईत सोनसाखळी चोराला अटक

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस आणि कल्याण-खडकपाडा पोलीस यांच्या संयुक्त पथकाने एका सराईत सोनसाखळी चोराला अटक केली. यावेळी हा व्यक्ती पोलिसांच्या ताब्यातून निसटण्याचा अतोनात प्रयत्न करत होता. मात्र, पोलिसांच्या पथकाने नियोजनपूर्वक कारवाई करत आंबिवली येथील ईराणी वस्तीतून संशयिताला ताब्यात घेतले. ही कारवाई शुक्रवारी (दि.३) रात्री करण्यात आली. या आरोपीने पनवेल आणि आसपासच्या परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावून नेण्याचे अनेक गुन्हे केल्याचा संशय आहे.

# नागोठण्यात पर्यावरण जनजागृतीपर रॅली

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

लायन्स क्लब इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेकडून जगभर १ ते ८ ऑक्टोबर दरम्यान सेवा सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यानुसारच रायगड जिल्ह्यात नावलौकिक मिळविलेल्या नागोठणे लायन क्लबकडूनही सेवा सप्ताहनिमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग असलेल्या पर्यावरण विषयक जनजागृती रॅलीचे आयोजन नागोठणे लायन्स क्लबकडून शुक्रवारी (दि.३) करण्यात आले होते.



## ● सेवा सप्ताहनिमित्त विविध उपक्रम

यारॅलीचीसुरुवातनागोठण्यातील गवळआळी येथील श्री राधाकृष्ण व साईबाबा मंदिरापासून सकाळी १०.४५ वाजता करण्यात आली. त्यानंतर ही रॅली गांधी चौक, ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय, छ. शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, खुमाचा नाकामार्गे पुन्हा श्री राधाकृष्ण मंदिरात आल्यानंतर या रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीत पर्यावरण विषयक जागृतीपर अनेक घोषणा देण्यात आल्या.

नागोठणे लायन्स क्लबची टीम, एस.डी. परमार इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिक्षिका स्नेहा काटले, स्मिता पाटील यांच्यासह इयत्ता ९ वी व १० वीचे ४६ विद्यार्थी या रॅलीत सहभागी झाले होते. या रॅलीत जनजागृतीपर संदेश देणारे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेतले होते.

# आठ गावांची 'सुंदर गाव पुरस्कारा'साठी निवड

**| पालघर | प्रतिनिधी |**

ग्रामीण विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी पालघर जिल्ह्यातील आठ गावे 'सुंदर गाव पुरस्कार'साठी निवडली गेली आहेत. यामध्ये पालघर तालुक्यातील कुरगाव, तलासरी तालुक्यातील आमगाव व आच्छाड, वाडा तालुक्यातील हमरापूर, विक्रमगड तालुक्यातील



वसुरी, मोखाडा तालुक्यातील खोडाळा, वसई तालुक्यातील खानिवडे, जव्हार तालुक्यातील झाप व डहाणू तालुक्यातील घोलवड या गावांचा समावेश आहे. तर तालुक्यातील कुरगाव हे गाव जिल्हास्तरीय सुंदर गाव म्हणून ठरले असून या ग्रामपंचायतीने ५० लाख रुपयांचे बक्षीस पटकावले आहे.

४ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत आयोजित रोजगार मेळावा व सेवा पंधरवडा समारोप समारंभात हा पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी कुरगाव ग्रामपंचायतीला जिल्हास्तरीय ४० लाख आणि तालुकास्तरीय १० लाख, असे एकूण ५० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. हा पुरस्कार पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## आ. शेखर निकमांच्या प्रयत्नांना यश | तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत कोटीचा निधी मंजूर

# दुर्गम वाड्यांमध्ये सौर प्रकाशाचा 'किरण'

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

डोंगराळ, दुर्गम भागात राहणाऱ्या धनगरवाड्यांसह चिपळूण तालुक्यातील एकूण १३ वाड्या-वस्त्यांना वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत तब्बल १ कोटींचा निधी सौर ऊर्जा पथदीपांसाठी मंजूर झाला आहे. आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याला आलेल्या यशामुळे दुर्गम भागात वसलेल्या वस्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या योजनेंतर्गत मंजूर झालेल्या निधीतून मौजे कोंडमळा धनगरवाडी, कोसबी धनगरवाडी, वेहेळे भोजनेवाडी, डेरवण धनगरवाडी, सावर्डे धनगरवाडी, पोफळी ऐनाचे तळे, करजवाडा क्रमांक १ व २,



> दुर्गम भागातील जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत हा निधी मिळवता आला. या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील वाड्यांमध्ये सुरक्षिततेचा व विकासाचा नवा अध्याय सुरू होईल.
> -आ. शेखर निकम

तळसर शेवरीचा दंड, कोळकेवाडी, जांभरई/वाडसाडी, मालदोली भोईवाडी आणि भिले भोईवाडी या वाड्यांत सौर ऊर्जा पथदीप उभारले जाणार आहेत.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांचा प्रश्न निकाली निघाल्याने स्थानिक ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. दिवसाच्या प्रकाशासारखा उजेड आता आमच्या वाड्यांत कायमस्वरुपी मिळणार आहे. उभारण्यात येणारे सौर पथदीप सौर ऊर्जेवर चालणार असल्याने वीजबिलाचा कोणताही खर्च होणार नाही. अंधार आणि भीतीचे दिवस मागे पडणार आहेत, अशा भावना व्यक्त करत आमदार निकम यांना धन्यवाद दिले आहेत.

### नागरिकांची सुरक्षितता वाढणार

या वाड्यांतील रहिवाशांना आतापर्यंत अंधार पडल्यानंतर घराबाहेर पडणे म्हणजे धाडसाचे काम होते. रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य, महिलांना आणि वृद्धांना असुरक्षिततेची भीती, मुलांच्या शिक्षणासाठी अडचणी, तर वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने कायम धोका वाढला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून ही परिस्थिती होती. मात्र, आता उभारण्यात येणारे सौर पथदीप सौर ऊर्जेवर चालणार असल्याने वीजबिलाचा कोणताही खर्च होणार नाही. तसेच, नागरिकांना रात्री अपरात्री सुरक्षितपणे प्रवास करता येईल. महिला व वृद्धांची सुरक्षितता वाढेल. वन्यप्राण्यांच्या संभाव्य हल्ल्यांपासून मोठ्या प्रमाणावर बचाव होण्यास मदत होणार आहे.

## निवडक




### अभिजात मराठी भाषा वर्धापन दिन

**म्हसळा :** भारतातील अभिजात भाषांच्या समृद्ध परंपरेचा गौरव करणे, त्यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भारत सरकारने काही भाषा अभिजात भाषा म्हणून घोषित केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने संस्कृत, तामिळ, तेलूगु, कन्नड, मल्याळम, ओडिसा या प्रमुख भाषा आहेत. माझी मायबोली मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. याचे औचित्य साधून केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय, म्हसळा येथे अभिजात मराठी भाषा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वक्त्यांनी कविता सादर करून मराठी भाषेचा दर्जा, मराठी भाषेचे संवर्धन आणि जपणूक याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, संत महंतांनी प्रेरित केलेली मराठी भाषा संस्कृती, मराठी भाषेचे मोल आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विलास यादव यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेच्या अभिजाततेचा गौरव करताना असे उपक्रम हीच आपल्या भाषेची खरी जोपासना असल्याचे सांगितले.



### वाहतूक शाखेतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण :** न्हावा शेवा वाहतूक शाखेच्या वतीने तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात नुकताच रस्ते वाहतूक नियमन व सुरक्षा मार्गदर्शन घेण्यात आले. या प्रबोधनपर कार्यक्रमात वाहन चालविताना आपल्या घरातील पालकांनी हेल्मेटचा वापर करणे, दारू पिऊन गाडी न चालविणे वाहतुकीचे सर्व नियम पाळणे तसेच रोडवर अपघात झाल्यास जखमींना तात्काळ हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणे, तसेच १०० नंबर किंवा ११२ नंबरवर फोन करून अपघाताची माहिती तात्काळ देण्यात यावी व जवळच्या वाहतूक चौकीला व पोलीस स्टेशनला कळवावे, तसेच १०८, १०३३ क्रमांकावर फोन करून ॲम्बुलन्स बोलवावी, अशा सुचना विद्यार्थ्यांना देऊन त्याद्वारे प्रबोधन करण्यात आले. सध्या पावसाळा सुरू आहे. त्यामुळे आपण आपली वाहने सावकाश चालवावीत, असे आवाहन न्हावा शेवा वाहतुक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी विद्यार्थ्यांना केले.



### वावोशीमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**वावोशी :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व भारतीय बौद्ध महासभा छत्तीशी विभाग क्र. १ अंतर्गत वावोशी भिमनगर ग्राम शाखेत २ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय बौद्ध महासभेचे रायगड जिल्हा महासचिव व प्रवचनकार राजेंद्र क्षीरसागर यांनी 'सम्राट अशोकाचे धम्म कार्य' या विषयावर प्रबोधन घडवले. त्यांनी सम्राट अशोक बौद्ध धम्माकडे कसे वळले, त्यांनी भारतात धम्माचा प्रचारप्रसार कसा केला आणि विसाव्या शतकात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची घेतलेली दीक्षा तसेच बौद्ध लेण्यांचे ऐतिहासिक महत्व, बौद्धांची आचारसंहिता याबाबतदेखील सविस्तर माहिती दिली. त्यांच्या प्रवचनाने उपस्थित धम्म उपासक, उपासिका मंत्रमुग्ध झालेले पहायला मिळाले.

### विमानतळापर्यंत एनएमएमटी सेवा

**● प्रवासी, कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा**

**नवी मुंबई :** खालापूर, खोपोली, कर्जतपासून ते थेट बोरिवलीपर्यंत लाखो प्रवाशांच्या सेवेत कार्यरत असलेल्या नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेचा (एनएमएमटी) विस्तार आता थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत वाढणार आहे. या विमानतळाचे उद्‌घाटन बुधवार दि.८ ऑक्टोबर रोजी झाल्यानंतर एनएमएमटीच्या २० बसेसचे परिचालन या नवीन मार्गावर सुरू होणार आहे. त्यामुळे विमानतळावर जाणारे प्रवासी आणि कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्यानंतर नवी मुंबई महापालिकेनेही या परिसरातून एनएमएमटी बसेसचे परिचालन सुरू करण्याची प्राथमिक तयारी सुरू केली आहे. महापालिकेच्या परिवहन विभागाने १५० नवीन सीएनजी गाड्या खरेदीची निविदा प्रसिद्ध केली आहे. विमानतळाचे उद्घाटन होताच पहिल्या टप्प्यात २० बसेस विमानतळ मार्गावर चालवल्या जाणार आहेत. नवी मुंबई विमानतळापासून नवी मुंबई महापालिकेची हद्द काही मिनिटावर आहे. त्यामुळे विमानतळ सुरू होताच विमानतळाला रेल्वे स्थानकाशी जोडण्यासाठी पालिकेचा परिवहन विभाग तयारी करत आहे. एकीकडे विमानतळापासून लगतच असलेल्या रेल्वे मार्गाबरोबरच हार्बर रेल्वेपर्यंतच्या स्थानकापर्यंत सेवा सुरू करण्याबाबतची पूर्वतयारी करण्यात आली आहे, अशी माहिती एनएमएमटीच्या सूत्रांकडून मिळत आहे.



### कल्याण पूर्व भागात खड्डे स्पर्धा

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील रस्त्यांची खड्ड्यांनी चाळण झाली आहे. हे रस्ते सुस्थितीत करा म्हणून गेल्या महिनाभर आयुक्त, बांधकाम कार्यकारी अभियंता यांच्यामागे लागूनही कोणीही त्याची दखल घेत नाही. त्यामुळे संतप्त झालेले कल्याण पूर्वेतील माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी कल्याण पूर्वेतील खड्डे पडलेल्या रस्त्यांची खड्डे स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांची दुरावस्था झालेले रस्ते, खड्ड्यांची छायाचित्रे गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि ऑस्कर सन्मानासाठी पाठविण्यात येणार आहेत, अशी माहिती माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी दिली. कल्याण शहरातील रस्त्यांची खड्ड्यांमुळे चाळण झाली आहे. वाहनचालकांना वाहने चालविणे अवघड झाले आहे. प्रवाशांचे खड्ड्यांमुळे हाल होत आहेत. कल्याण पूर्वेतील खड्ड्यांमुळे वाहने संथगतीने धावत असल्याने दररोज पूर्व भागात वाहतूक कोंडी होते. कल्याण पूर्वेतील खड्डे लवकरात लवकर भरावेत म्हणून गेल्या महिनाभरापासून माजी नगरसेवक महेश गायकवाड आयुक्त अभिनव गोयल, पालिका बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश कोरे यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. ही खड्ड्यांची परिस्थिती दाखविण्यासाठी स्वतः आयुक्त गोयल यांना कल्याण पूर्व शहराच्या विविध भागात फिरवले. त्यांना वस्तुस्थिती दाखवली.आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या होत्या. मात्र एक महिना उलटला तरी पालिकेकडून कल्याण पूर्व भागातील रस्ते सुस्थितीत करण्याचे नाव घेतले जात नाही, असे गायकवाड यांनी सांगितले.

# पाली शहरात पाण्याची गळती

। सुधागड–पाली । प्रतिनिधी ।

**सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीतील गांधी चौक व श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर अनेक ठिकाणी पाण्याची गळती लागली आहे. या गळतीमुळे शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. त्यातच परिताचा पाऊस धुमाकूळ घालत असून या गळतीमुळे रस्त्यावर चिखल व घाणीचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, या फुटलेल्या पाण्याच्या वाहिनीतून दुषीत पाणी जाऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भिती देखील वर्तविली जात आहे. असे असतानाही नगरपंचायत याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.**



- **नगरपंचायतीचे जाणूनबुजून दुर्लक्ष**
- **स्थानिकांसह सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप**

जिल्ह्यात परतिचा पाऊस धुमाकूळ घालत असतानाच सुधागड तालुक्यात पाण्याची वाहिनी फुटून गळती लागली आहे. येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज.नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, तसेच अमूल आईस्क्रीम दुकानासमोरील भागात नळजोडणीच्या ठिकाणी सतत पाणी गळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. गेले आठ ते १५ दिवस ही गळती सुरू असून या गळतीकडे पाली नगरपंचायतीकडून दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. तसेच, गांधी चौक हे शहराचे मध्यवर्ती ठिकाण असून, येथील गणपती मंदिर परिसरात भाविकांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे येणाऱ्या भाविकांनाही मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यांच्यातूनही नाराजीचे सुर उमटत आहेत. एकीकडे शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना, दुसरीकडे शेकडो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. ही परिस्थिती नागरिकांच्या पाण्याच्या हक्कावर अन्याय करणारी ठरत आहे. तसेच, फुटलेल्या वाहिनीतून दुषीत पाणी जाऊन त्याचा स्थानिकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे.

> पाली शहरातील पाण्याच्या गळतीच्या समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी पाणीपुरवठा सभापती प्रतीक्षा पालांडे यांच्या नेतृत्वाखाली सर्व नगरसेवकांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत गळतीग्रस्त भागांची यादी तयार करून दुरुस्तीचे काम त्वरित सुरू करण्यात येणार आहे.
> – सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली नगरपंचायत

> पाली शहरातील ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गळती सुरू आहे तसेच पाण्याचा अपव्यय होत आहे, त्या सर्व ठिकाणी नगरपंचायतीने तात्काळ दखल घेऊन दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करावे.
> –पी. सी. पालकर, ग्रामस्थ, पाली

त्यामुळे अशा ठिकाणी पाण्याची गळती सुरू असताना नगरपंचायतीला ती दिसत नाही का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी, तात्काळ गळती दुरुस्त करून पाण्याचा अपव्यय थांबवावा, अशी मागणी केली आहे. तसेच, नगरपंचायतीने दैनंदिन देखभाल यंत्रणा सक्षम करावी, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली आहे.

## विनोद चोगले यांचे निधन

**श्रीवर्धन :** तालुक्यातील समाजसेवक विनोद चोगले यांचे पुणे-विठ्ठलवाडी येथे २९ सप्टेंबर रोजी निधन झाले. निधनासमयी ते ५४ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच श्रीवर्धन, मुरुड, म्हसळा,



दिवेआगर, बोर्लीपंचतन, केळशी, वेळास, पुणे येथील नागरिकांनी तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक बेरोजगार तरुण -तरुणींना रोजगाराला लावून त्यांच्या कुटुंबियांना मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगी आणि आप्तेष्ट असा परिवार आहे.

## निवडक



### मुरुड समुद्रकिनारी पर्यटक दाखल

**आगरदांडा :** मुरुड तालुका पर्यटन क्षेत्र असुन येथील समुद्रकिनारे, ऐतिहासिक स्थळे आणि नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करत असतात. त्यामुळे पर्यटकांची पावले आपोआप मुरुड समुद्रकिनारी वळतात. परंतु, ऐन हंगामात म्हणजेच मे महिन्याच्या अखेरीस पावसाने सुरूवात केल्याने पर्यटकांची रेलचेल कमी होत गेली. मात्र, ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला पावसाची उघड झाप होत असून अखेर पाच महिन्यांनी पर्यटक मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर आनंद आहे. यावेळी विविध जिल्ह्यांतील पर्यटक शनिवारी (दि.४) सायंकाळपासून आपल्या वाहनांतून मुरुड समुद्रकिनारी दाखल झाले आहेत. त्यांनी येथील स्वच्छ निळ्याशार समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला, तर काहींनी बनाना राईड्स, घोडागाडी व बाईकवर सवारी केली. त्याचवेळी किनाऱ्यावर क्रिकेट खेळण्याचा आनंदही पर्यटकांनी लुटला. त्यामुळे स्थानिक हॉटेल, टपरीधारक व लॉजींग व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### प्रकाश म्हात्रे यांना पितृशोक



**अलिबाग :** तालुक्यातील खारेपाट विभागातील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते विष्णू फाल्गून म्हात्रे यांचे बुधवारी (दि.१) वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी ते ९४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन व नातवंडे असा परिवार आहे. प्रकाश म्हात्रे यांचे ते वडील होतं. विष्णू म्हात्रे यांनी खारेपाटात शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा घरोघरी फडकविण्याचे काम त्यावेळी केले. रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष दिवंगत प्रभाकर पाटील यांच्या सोबत त्यांनी काम केले आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. शेकापचा एक सच्चा कार्यकर्ता हरपला असून म्हात्रे कुटूंबियात दुःखाचे डोंगर कोसळले आहे.



### हिंदवी नागरी पतसंस्थेची सभा

**खरोशी :** हिंदवी नागरी सहकारी पतसंस्था पेण या पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.५) संस्थेच्या कार्यालयात विविध विषयांवर चर्चा करून संपन्न झाली. या सभेत विविध स्पर्धा परीक्षेमध्ये सुयश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सर्वसाधारण सभेमध्ये मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे, नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे, शासकीय तपासणी अहवालाचे वाचन, अंदाज पत्रकास मंजुरी, अंतर्गत हिशेब तपासण्याची नेमणूक, ऑडिटर यांची नेमणूक, सुधारित आदर्श उपविधी लागू करणे इत्यादी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष रवींद्रनाथ पाटील, सचिव अनंत सावंत, संचालक धनाजी घरत, तुकाराम म्हात्रे, सचिन बांदिवडेकर, शंकर कांबळे, माजी संचालक सतीश पाटील व कवी मोकल, विद्या घरत यांच्यासह कार्यालयीन कर्मचारी आनंदी म्हात्रे, नरेश म्हात्रे व कविता जंगम उपस्थित होते.

### वाहन नोंदणीसाठी नवी मालिका

**नवीन पनवेल :** पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) वाहन नोंदणीसाठीची एमएच ४६ सीयु मालिका संपुष्टात येत असून आता एमएच ४६ डीसी ही नवीन मालिका सुरू करण्यात आली आहे. सोमवारी (दि.६) सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे नवीन नंबर नोंदणीसाठी चे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर लगेचच किंवा पुढील दिवशी शुल्काचा धनादेश जमा करणे आवश्यक असणार आहे. एखाद्या क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास मंगळवारी (दि.७) दुपारी ४ वाजता लिलाव प्रक्रियेतून क्रमांक वाटप केले जाणार आहेत. आकर्षक पसंतीच्या नोंदणी क्रमांकाचे शुल्क भरणा केलेल्या तारखेपासून १८० दिवसापर्यंत संबंधित क्रमांक आरक्षित राहील. या कालावधीत वाहनाची नोंदणी न केल्यास १८० दिवसानंतर आरक्षित वाहन क्रमांक हा अनारक्षित समजला जाईल आणि शुल्काचा परतावा केला जाणार नाही.





## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पाहिजेत!!! अलिबाग येथील दुकानात आणि टायर साठी अनुभवी किंवा फ्रेश मुले हवी आहेत. कॉम्प्युटर बिलिंग साठी मुले हवी आहेत.संपर्क:८१४९४८०६८४
- नोकरीची संधी - सफाई कर्मचारी (बर्गर्स आणि बूच, रांजणपाडा, अलिबाग) आमच्या टीममध्ये सामील होण्यासाठी आम्ही एक मेहनती आणि प्रामाणिक व्यक्ती शोधत आहोत. तपशील: पगार: ₹१३,०००/ महिना+ टिप्स/सेवा (७%) राहण्याची व्यवस्था आणि जेवण साप्ताहिक सुट्टी : मंगळवार कामाचे तास : दुपारी १२ ते रात्री ११ (दररोज किमान २ तासांच्या ब्रेकसह) व्हाट्सॲपवर कॉल करा : ७५०६९५४६११/ ९९३०६३४००३
- खुद्द अलिबाग मध्ये १ बेड हॉल किचन फ्लॅट भाडेतत्त्वावर द्यावयाचा आहे. भाडे ₹ १५.००० डिपॉझिट ₹ ६०,०००. एजंट क्षमस्व फोन नंबर ९८६९४५९०६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जाहिरात विश्वातील बदलांचे संकेत

। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनीतील एमआयडीसी रोड येथील पराडे कॉर्नर येथे 'पॅराडाईज एंटरटेनमेंट' या डिजिटल जाहिरात सेवांच्या कंपनीचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. 'टर्निंग व्हिजन इनटू व्हिझबिलटी' या ब्रीदवाक्यासह सुरू झालेल्या या उपक्रमातून बदलत्या जाहिरात क्षेत्राचे चित्र स्पष्ट झाले आहे.



आज पारंपरिक होर्डिंग आणि छापील माध्यमांची पकड कमी होत असताना एलईडी स्क्रिनवरील डिजिटल जाहिराती व्यवसायांना ग्राहकांपर्यंत पोहोचविणारे प्रभावी साधन ठरत आहेत. पॅराडाइज एंटरटेनमेंटकडून योग्यवेळी या माध्यमाचा स्वीकार करण्यात आला असल्याचे उपस्थित उद्योग, प्रशासकीय आणि सामाजिक मान्यवरांनी नमूद केले. या उद्घाटन सोहळ्यास राज ग्रुप तुलसी होम मेकरचे डायरेक्टर अभिजीत पाटील व अस्मिता पाटील, रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, थोरवे कन्स्ट्रक्शनचे संस्थापक गणेश थोरवे, सेटनेटचे संस्थापक मिथुन आणि मिताली साळुंखे आदी मान्यवरांसह विजय मिरकुटे, भालचंद्र थोरवे, रोहन भोईर, नितेश आंग्रे, पराग तेलवणे, संजय जोशी, राजेंद्र घोलप, सचिन मोरे, डॉ. श्रीकांत आणि संदीप आदी उपस्थित होते.

### डिजिटल जाहिरात क्रांतीची नांदी

**नवी मुंबई, पनवेल आणि रायगड परिसरातील व्यापाऱ्यांसाठी डिजिटल जाहिरात सेवा आता स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. या माध्यमातून स्थानिक उद्योगांना नवी ऊर्जा आणि व्यावसायिक संधी मिळतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. हा शुभारंभ केवळ नवा व्यवसाय उपक्रम नसून आगामी डिजिटल जाहिरात क्रांतीची नांदी असल्याचे कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र थोरवे यांनी बोलताना सांगितले.**



## कंत्राटी कामगारांना गणवेश वाटप

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरातील स्वच्छता आणि आरोग्य विभागातील सफाई कामगारांना गणवेश आणि ईएसआयसीई कार्डचे वाटप करण्यात आले. कर्जत नगरपरिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन तसेच श्री बापदेव महाराज सहकारी संस्था यांच्यावतीने हा वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कर्जत शहरातील बुद्धनगर येथील समाज मंदिर हॉल येथे आयोजित कार्यक्रमाला म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन सरचिटणीस अनिल जाधव, कर्जत नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, नगरपरिषद आरोग्य निरीक्षक रुपेश भोईर, लोणावळा नगरपरिषदेचे पथविक्रेता समितीचे हर्षल होगले तसेच कर्जत नगरपरिषद मधील कामगार युनियनचे राहुल गायकवाड आदी उपस्थित होते.



## काँग्रेस पक्षाचे नवीन कार्यालय

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुका काँग्रेस कमिटीचे नवीन कार्यालयाचे उद्घाटन माजी तालुका अध्यक्ष आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अरविंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय गवळी यांच्या पुढाकाराने पक्षाचे नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ कार्यकर्ते सूर्यकांत पाटील, जॅकी नजे, जगन्नाथ शेळके, सीताराम बदे, अय्याज डोंगरे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. संतोष सदावर्ते, नेरळ शहराध्यक्ष आनंद मोडक, युवक कर्जत तालुका माजी अध्यक्ष मनीष राणे, राहुल तरे, सुरज पंडित आदी उपस्थित होते. तसेच, शिवसेनेचे उप तालुका प्रमुख अंकुश शेळके, मिलिंद विरले, मनसेचे तालुका उपाध्यक्ष मिलिंद मिसाळ आदी कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## शाहीदा मजगावकर यांचे निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुरूडमधील शाहीदा आदम मजगांवकर यांचे २१ सप्टेंबर रोजी निधन झाले. मुरूडमधील सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक मुद्दसिर आदम मजगांवकर यांच्या त्या मातोश्री होत्या. शाहीदा मजगांवकर यांचा स्वभाव, मनमिळावू होता. तसेच, समाजहित जपणारे त्यांचे व्यक्तीमत्व होते. गोरगरीबांच्या समस्या सोडविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. गृहिणीबरोबरच सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. शाहीदा मजगांवकर यांच्या आजारपणावर गेल्या अनेक महिन्यांपासून उपचार सुरु होते.

## शासकीय योजनांचे कार्ड वितरण

। खांब । प्रतिनिधी ।

संगाथ प्रकल्पांतर्गत रोह्यातील सहयोग अपंग कल्याणकारी संस्थेच्यावतीने व दिपक फाऊंडेशनच्या सहकार्याने शनिवारी (दि.४) नेहरू नगर शाळा क्र. ८ मध्ये दिव्यांगासाठीच्या विविध शासकीय योजनांचे कार्ड वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद लाभला.



दिपक फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक प्रविण ठोसर यांच्या सहकार्याने पर्यवेक्षक अपेक्षा केतन खारिवले व रसिका करण माने यांच्या सहयोगाने दिव्यागांच्या हिताच्या विविध शासकीय योजनांचे लाभ घेण्याकरिता लागणारे आयुष्मान भारत, आभा कार्ड, आधार कार्ड केवायसी, दिव्यांग व्यक्तीची ऑनलाइन यूडीआयडी केवायसी या योजनांचे ऑनलाइन विनामूल्य अर्ज करून मोफत कार्ड वितरण शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तब्बल ८६ लाभार्थ्यांनी उत्फूर्तपणे सहभाग दर्शवून लाभ घेतला. यावेळी सहयोग अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष राजेश कांबळे, उपाध्यक्ष नंदलाल गुप्ता, सेक्रेटरी रमेश खराडे, कोषाध्यक्ष संजय टी टी., सल्लागार किरण मोहिते, सहकोषाध्यक्ष निवृत्ती सुर्वे, सदस्या जयश्री पुजारी, वैशाली पवार आदींसह दिव्यांग व्यक्ती व नागरिक उपस्थित होते.

# माणगाव लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी संदीप नागे

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील लायन्स क्लब माणगावच्या २०२५-२६ या वर्षासाठीच्या नवीन संचालक मंडळाचा प्रमाणपत्र प्रदान, सदस्य नोंदणी आणि पदग्रहण सोहळा ३० सप्टेंबर रोजी पार पडला. हा समारंभ माणगाव येथील हॉटेल उत्सव येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी नवीन संचालक मंडळामध्ये संदीप नागे यांनी अध्यक्षपदाची सुत्रे हाती घेतली.




लायन्स आंतरराष्ट्रीय जिल्हा ३२३१ ए ४ च्या नेतृत्वाखालील या कार्यक्रमात लायन्स क्लब पोयनाड या प्रायोजक क्लबच्या उपस्थितीत 'प्रकाशमय व्हा' या संदेशासह नवीन कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यासाठी जिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी, प्रथम उप प्रांतपाल प्रवीण सरनाईक, द्वितीय उप प्रांतपाल विजय गणत्रा, माजी प्रांतपाल अनिल जाधव, क्षेत्र समन्वयक प्रिया पाटील, क्षेत्राध्यक्ष गिरीश म्हात्रे, जिल्हा जीएसटी समन्वयक प्रदीप सिनकर, प्रियदर्शिनी पाटील आणि विभाग प्रमुख सुस्मिता सित्यालकर, लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी यांसारख्या अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी नवीन संचालक मंडळामध्ये संदीप नागे यांनी अध्यक्षपदाची, प्रणल घाग यांनी प्रथम उपाध्यक्षपदाची, विनायक टेटगुरे यांनी सचिवपदाची आणि अमोल जंगम यांनी कोषाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. याशिवाय, मिहीर फोंडके, गणेश काळे, निलेश थोरे आणि सुरेश मोहिते यांच्यासह अन्य पंधरा संचालकांनी आपापल्या पदाची सूत्रे हाती घेतली.

## पनवेलमध्ये चोरी

**पनवेल :** खारघर सेक्टर २७ येथील रोहित गुगळे यांचा खारघर सेक्टर २ येथे आर.जी. डिस्ट्रीब्युटर्स नावाचे शॉप आहे. त्यांनी शॉपमध्ये लॅपटॉप आणि मोबाईल ठेवले होते. दरम्यान, चोरट्यांनी शटर उचकटून दोन लॅपटॉप आणि तीन मोबाईल चोरून नेले आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन अज्ञात व्यक्ती तोंडाला मास्क लावलेले दिसून आले. अधिक तपास खारघर पोलीस करीत आहेत.

अस्मिता भोईर यांचा प्रामाणिक प्रयत्न | दहा हजारहून अधिक महिलांना धडे

# प्रशिक्षणातून ग्रामीण महिलांना आर्थिक बळ

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मुळखानाव येथील अस्मिता वैभव भोईर यांनी स्वतः शिक्षण घेऊन परिसरातील हजारो महिलांना प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे. शिवणकला, ब्युटी पार्लर, केक, मेहंदी, रांगोळी अशा अनेक प्रकारचे प्रशिक्षण घेऊन आज १० हजारहून अधिक महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. यशस्वी व्यावसायिक म्हणून त्यांनी कर्तृत्व सिद्ध केले आहे.



अस्मिता भोईर यांनी शालेय शिक्षण पुर्ण झाल्यावर स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे स्वप्न पाहिले. स्वतःचा काहीतरी व्यवसाय असावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यावेळी अस्मिता भोईर यांना बळ देण्याचे काम त्यांचे पती वैभव भोईर यांनी केले. त्यांनी स्वतः ब्युटी पार्लरचा व्यवसाय उभा केला असून या व्यवसायातून आर्थिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, कुटूंबाकडून मिळालेल्या प्रोत्साहनातून अस्मिता भोईर यांनी २०१६ पासून स्वतः व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची सुरूवात केली. त्यांनी स्वतः शिक्षण घेऊन इतरांनादेखील प्रशिक्षण देण्याचे काम त्यांच्याकडून करण्यात येत आहे.

गेल्या नऊ वर्षात अस्मिता भोईर यांनी जन शिक्षण संस्थान व इतर व्यावसायिक संस्थाच्या मार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांमधून ग्रामीण भागातील महिलांना शिवणकला, ब्युटी पार्लर, केक, मेहंदी, रांगोळी आदी व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे. आतापर्यंत त्यांनी १० हजारहून अधिक महिलांना प्रशिक्षण देऊन स्वतःदेखील एक चांगल्या व्यावसायिका बनल्या आहेत. व्यावसायिक प्रशिक्षणातून हजारो महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तसेच, अनेक महिलांना उत्तम प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंपूर्ण होण्यास सक्षम बनविले आहे.

### विविध पुरस्काराने सन्मानित

**ग्रामीण भागातील अस्मिता भोईर यांनी अगदी कमी वयात व्यावसायिक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दखल ग्रामपातळीपासून राज्य पातळीवर घेण्यात आली आहे. त्यांना आहिल्याबाई ग्रामपंचायत पुरस्कार, वुमन अॅवॉर्ड व उमेद महिला समुहातर्फे व्यवसायिक अॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच, माजी राज्यपाल भगत सिंह कोशारी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे.**

# पूरग्रस्तांसाठी बल्लाळेश्वर देवस्थानाकडून मदत

**। पाली । प्रतिनिधी ।**

मराठवाड्यात महापुराच्या तडाख्यात शेतीसह अनेकांचे संसारही वाहून गेले आहेत. धाराशीव, नांदेड, लातूर, परभणी, बीड, जालन्याला पडलेली महापुराची मगरमिठी अजूनही सैल झालेली नाही. येथील शेतांमध्ये अद्याप गुडघाभर पाणी असल्यामुळे पंचनामेही रखडले आहेत. त्यामुळे सरकारकडून मिळणाऱ्या मदतीची शेतकरी बांधव आस धरून बसला आहे. या पार्श्वभूमीवर अष्टविनायकांपैकी सुधागड-पाली येथील श्री बल्लाळेश्वर गणपती देवस्थानाने सामाजिक बांधिलकी जपत मदतीसाठी एक हात पुढे केला आहे. देवस्थानाच्यावतीने मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस २ लाख ५१ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.



- **सुधागड तहसीलदारांकडे धनादेश सुपूर्द**
- **आपत्कालीन परिस्थितीत मदतीचा ओघ सुरू**

अष्टविनायकांपैकी एक असलेले सुधागड तालुक्यातील श्री बल्लाळेश्वर देवस्थान संस्था पाली यांच्याकडून नेहमीच आपत्कालीन परिस्थितीत मदतीचा ओघ सुरू असतो. कोरोना काळात देखील देवस्थानाकडून भरघोस मदत करण्यात आली होती. देवस्थान मार्फत भक्तांसाठी तसेच गरीब गरजूंना सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यासाठी सातत्याने आर्थिक मदत करण्यात येते. प्रत्येक आठवड्यातून एक दिवस भक्तांसाठी व गरजू नागरिकांना विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहाय्याने मोफत आरोग्य सेवा पुरवली जाते. त्यामुळे देवस्थान संस्थेचे काम हे नेहमीच कृतिशील राहिले आहे. सध्या अतिवृष्टीमुळे मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, हजारो कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शासनाकडून मदतकार्य सुरू असताना धार्मिक आणि सामाजिक संस्थांनीही मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर देवस्थान संस्थेकडून शुक्रवारी (दि.३) मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षात २ लक्ष ५१ हजार रुपयांचा धनादेश सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, वैभव आपटे, विश्वास गद्रे, शेखर सोमण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने सांगितले की, आपत्तीग्रस्त बांधवांवर आलेल्या संकटाच्या काळात समाजहिताचा विचार करून मदतीचा हात पुढे करणे हीच खरी सेवा आहे. तसेच, बल्लाळेश्वर देवस्थानच्या या निर्णयामुळे भाविकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. गणराय केवळ भक्तांचा आराध्य नाही, तर संकटसमयी समाजासाठी आधारवड ठरतो, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

### एकात्मतेचे प्रतीक

मदत केवळ आर्थिक योगदान नसून, सामाजिक संवेदनशीलतेचा आणि एकात्मतेचा प्रतीक आहे. अशा उपक्रमांमध्ये बल्लाळेश्वर देवस्थान नेहमीच अग्रेसर राहिले आहे. समाजाशी असलेली नाळ अधिक घट्ट करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. देवस्थानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ग्रामपंचायतीच्या इमारतीची पायाभरणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर (दि.२) ऑक्टोबर रोजी भेंडखळ ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे नवीन बांधकामाची पायाभरणी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी भेंडखळ गावच्या प्रथम नागरिक सरपंच मंजिता पाटील, अजित वासुदेव ठाकूर, दिपक ठाकूर, लिलेश्वर भगत, संगिता भगत, सोनाली ठाकूर, शितल ठाकूर, स्वाती पाटील, स्वाती घरत, अक्षता ठाकूर, ग्रामपंचायत अधिकारी किरण केणी, ग्रामपंचायत कर्मचारी वृंद, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालय इमारतीची पायाभरणी करण्यात आली.

# खोपोलीत माजी सैनिकांना दिलासा



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजनेअंतर्गत खोपोली नगरपालिकेने माजी सैनिक व त्यांच्या विधवांना एका निवासी मालमत्ता कर जाहीर केली असून बुधवार (दि.१) ऑक्टोबर रोजी ४३ माजी सैनिकांना मालमत्ता उतारा कर व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला आहे. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजने अंतर्गत शासनाकडून मालमत्ता करत सूट देणे बाबत शासन निर्णय पारित झालेला आहे. त्या अनुषंगाने खोपोली नगर परिषदेमार्फत माजी सैनिकांना मालमत्ता करात सूट मिळवून देण्यासाठी मुख्याधिकारी, प्रशासक डॉ.पंकज पाटील, गैतम भगळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. सेवा पंधरवडा साजरा करण्यात आला त्या अनुषंगाने तहसील कार्यालय खालापूर व खोपोली नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मालमत्ता करांमध्ये सूट दिलेल्या सर्व माजी सैनिक व त्यांच्या वीरपत्नी एकूण ४३ यांचा मालमत्ता उतारा कर व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी तहसिलदार अभय चव्हाण, नायब तहसिलदार सुधाकर राठोड, नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशासक डॉ. पंकज पाटील, कर विभागाचे प्रमुख गैतम भगळे, माजी सैनिक संघटनेचे माजी अध्यक्ष प्रकाश महाडीक व्यासपीठावर उपस्थित होते.

# खालापूर-खोपोली काँग्रेस कमिटीची बैठक




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली खालापूर तालुका आणि खोपोली शहर काँग्रेस कमिटीची आढावा बैठक शुक्रवारी (दि.३) खोपोली येथे पार पडली. तिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

यावेळी यावेळी झालेल्या चर्चेत अनेक कार्यकर्त्यांनी सांगितले की, सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करून तरुणांना पक्षाशी जोडावे लागेल, यंदा खोपोलीमधून सात ते आठ नगरसेवक निवडून येऊ शकतात, अशीही आशा यावेळी व्यक्त केली गेली.

या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, निखिल ढवळे, रिचर्ड जॉन, देविदास म्हात्रे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

## बामणोली गावातील पुलाचे उद्घाटन

**माणगाव** : बामणोली गावातील नवीन पुलाचे उद्घाटन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ॲड. राजीव साबळे, सुभाष केकाणे, काका नवगणे, शर्मिला सुर्वे, हर्षदा सोंडकर, संगीता बक्कम, महादेव बक्कम, सुनील पवार, राजू शिर्के, शादाब गैबी, सुशील दसवते, सचिन बोंबले, शशिकांत मोहिते, इरफान हाजिते, ग्रामस्थ, महिला आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘विवाहमिलन’ वेबसाइटचे उद्घाटन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उपक्रमशील आगरी समाज संस्था, अलिबाग संचलित सर्वजातीय वधू-वर परिचय केंद्र आता ऑनलाईन स्वरूपात आपल्या सेवेत सुरू झाले आहे. मविवाहमीलन डॉट कॉमम या नवीन वेबसाइटचे दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर, गुरुवारी (दि.२) ऑक्टोबर रोजी हॉटेल गुरुप्रसादच्या सभागृहात उद्घाटन झाले.

मिलन प्रेमाचं, परंपरेच्या पवित्र बंधनाचं हे ब्रीद वाक्य घेऊन सुरू झालेल्या या वेबसाइटचे उद्घाटन डॉ. दीपक यशवंत पाटील आणि डॉ. जगन्नाथ मारुती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेबसाइटची विशेष बाब म्हणजे, ती केवळ आगरी समाजासाठीच नव्हे, तर सर्वजातीय उपवर वधू-वरांची नोंदणी करण्यासाठी खुली असणार आहे. उद्घाटन समारंभातच एक उत्साहपूर्ण क्षण पाहायला मिळाला. वरद सुनील तांबडकर या तरुणाचा विवाहमीलन डॉट कॉम या वेबसाइटवर लाइव्ह फॉर्म भरण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. दीपक पाटील, आगरी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील, उपाध्यक्ष सुनील तांबडकर, प्रभाकर ठाकूर, ॲड. सचिन पाटील, राजेंद्र पाटील, वैभव पाटील, बिपीन टेमकर, श्रेयस ठाकूर, मनोहर पाटील, वेदांती म्हात्रे उदय म्हात्रे यांची उपस्थिती होती.

संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी प्रास्ताविक करताना संस्थेची निर्मिती आणि आत्तापर्यंतचे कार्याचा आढावा घेतला. तर वेदांती म्हात्रे यांनी वेबसाइटच्या वेबसाइटची निर्मिती करणाऱ्या संजीव म्हात्रे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच, कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती दाखविणाऱ्या मंगेश म्हात्रे, रंजित म्हात्रे, प्रवीण घरत, सुजाता म्हात्रे, प्रसाद बा. पाटील, अनंत म्हात्रे, राजेश पाटील, अभिजीत पाटील, सतीश पाटील, विलास ठाकूर, धनंजय म्हात्रे, मिलिंद पाटील, तुषार थळे, ॲड. प्रसाद पाटील, रमण धुमाळ, शशिकांत मिठाग्री या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

# अनिल पुलेकर यांना पुरस्कार

**कोर्लई** : मुरुड येथील रहिवासी ठाण्यातील ज्येष्ठ समाजसेवक अनिल पुलेकर यांना सहकर्म सामाजिक कल्याण फाऊंडेशन (रजि.) द्वारे आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार-२०२५ ने सन्मानित करण्यात आले आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल कल्याण(पश्चिम)येथे इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शन, मुंबई व सहकर्म सामाजिक कल्याण फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात पुलेकर यांना ऑपरेशन कारगिल आणि २६/११ मध्ये उल्लेखनीय



कामगिरी करणारे सैन्य अधिकारी महेंद्र गवई ह्यांच्या हस्ते सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल आप्तेष्ट नातेवाईक, मित्र परिवार व चाहत्यांकडून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## वृक्षारोपण साजरा

**। उरण । प्रतिनिधी।**

यु. ई. एस. स्कूल व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विदयमाने शुक्रवार (दि.३) रोजी वृक्षारोपण सोहळा साजरा करण्यात आला. यु. ई. एस. स्कूल ॲण्ड कॉलेजच्या परिसरामध्ये फणस, बदाम, चिंच, जांभूळ व आंबा अश्या विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. वृक्षारोपण कार्यक्रमासाठी चंद्रकांत ठक्कर, अपूर्वा ठाकूर, ओव्हळ, सदानंद गायकवाड, संजीव अग्रवाल, ओव्हळ व इतर सदस्य तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.

**उरण नगरपरिषद, उरण**
**ता. उरण, जिल्हा-रायगड**
**पिन कोड - ४००७०२**

Email- municipalcounciluran@gmail.com urancouncil@rediffmail.com

जा.क्र.:उनप/आस्था. विभाग/२०२५-२६/१६४२ दि.०५/१०/२०२५

**नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणुक-२०२५**
**जाहीर सूचना**

उरण नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणेसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| १ आरक्षण सोडत दिनांक | वार -बुधवार,<br>दिनांक- ०८/१०/२०२५<br>वेळ-सकाळी १०.०० वा.<br>स्थळ - नगरपरिषद कार्यालय उरण |
| २ आरक्षण प्रसिद्ध करण्याचा दिनांक | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ |
| ३ हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ ते मंगळवार, दिनांक १४/१०/२०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

टीप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना आवश्यक असल्यास सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण : उरण
दिनांक : ०६/१०/२०२५

सही/-
**(समीर जाधव)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

**रोहा नगर परिषद**
ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं.कार्यालय ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं.०२१९४/२३४०७८
email :rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/निवडणूक/जा.क्र./आरक्षण सोडत/१०६६/२०२५-२६. दिनांक-०३/१०/२०२५

**परिशिष्ट - ४**
**(सोडत व आरक्षण प्रसिद्धी जाहीर सूचनेचा नमुना)**
**रोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**जाहीर सूचना**

रोहा नगर परिषद सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणेसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १ आरक्षण सोडत दिनांक | वार - बुधवार<br>दिनांक ०८/१०/२०२५<br>वेळ सकाळी ११.०० वाजता<br>स्थळ-रोहा नगर परिषद कै. द.ग.तटकरे सभागृह, रोहा, ता.रोहा, जि.रायगड |
| २ आरक्षण प्रसिद्ध करण्याचा दिनांक | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ |
| ३ हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर करावयात) | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ ते मंगळवार, दिनांक १४/१०/२०२५ (दुपारी ३.०० पर्यंत) |

**टीप :** हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना आवश्यक असल्यास सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण : रोहा
दिनांक : ०३/१०/२०२५

सही/-
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी रोहा नगर परिषद**

**अलिबाग येथील तिकिट विक्री आजपासून सुरु**
**शनि.दि.११ ऑक्टोबर रात्रौ ९.३० वा.**
**पी.एन.पी. नाट्यगृह (अलिबाग) A/C**
**ति.वि. आजपासून पीएनपी नाट्यगृह येथे सुरु**
**संयोजक : चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६**




**संपर्क - विकास पावसकर ९९२०६२९९२३, सुनील पानकर ९४२२६३०१०५**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**ई निविदा सूचना क्रमांक ४२/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पनवेल येथील खांदा कॉलनीतील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती खांदा कॉलनीतील परिसरातील पथदिव्यांची, एलईडी फ्लड लाईट्स व ट्रान्सफॉर्मरची दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल दुरूस्ती करणे. | ₹ १२,२८,७२९.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती. रोहा येथील जलशुद्धीकरण केंद्रातील क्लोरीन गळती शोषण प्रणालीची दोन वर्षांच्या कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹४,८६,०००.०० |
| ३ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... मे.गेल यांच्या एलपीजी रिकव्हरी प्लांटसाठी तसेच उसर व मार्गावरील गावांकरीता टाकण्यात आलेल्या ४०० मि.मी. व्यासाच्या सीआय जलवाहिनीची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹१५,८८,२१३.०० |
| ४ | पेण अलिबाग व नागोठणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... .. पाणीपुरवठा योजनांसाठी कारखाने कायदा १९४८ नुसार आवश्यक परवाने काढणे. (दुसरी मागणी) | ₹१५,२५,०००.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ३ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०८/१०/२०२५ ते दिनांक २४/१०/२०२५ पर्यंत व अ.क्र. ४ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०८/१०/२०२५ ते दिनांक १७/१०/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र. १ ते ३ वरील कामांबाबत दिनांक १३/१०/२०२५ पूर्वी व अ.क्र. ४ वरील कामाबाबत दिनांक ०९/१०/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र.१ ते ३ वरील कामांबाबत दिनांक १६/१०/२०२५ पासून व अ.क्र.४ वरील कामाबाबत दिनांक १०/१०/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे नांदाईपाडा, ता.अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत आहे. सदर मिळकतीचे इतर सहहिश्शेदार यांनी श्री. विश्वनाथ कृष्णा पेढवी यांना मिळकतीचे विक्री व्यवहार करण्याबाबत अखत्यारपत्र दिलेला आहे. त्या अखत्यारपत्राच्या आधारे श्री. विश्वनाथ कृष्णा पेढवी यांसकडुन सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदी करण्याचे आमचे अशिलांनी ठरविलेले आहे. त्याअनुषंगाने आमचे अशिल व श्री विश्वनाथ कृष्णा पेढवी यांच्यामध्ये दिनांक ०९/०५/२०२२ रोजी लेखी साठेकरार झालेला आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नांदाईपाडा, ता.अलिबाग | १४९ | ०-१९-००<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-२३-०० | ३.९५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात आमचे अशिल व श्री. विश्वनाथ कृष्णा पेढवी व इतर सहहिश्शेदार यांच्यात विक्री व्यवहार झालेल्या असल्याकारणांने सदर मिळकतीसंदर्भात अन्य कोणीही कसल्याहीप्रकारे व्यवहार करू नये व त्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत असणार आहे. तसेच सदर मिळकतीचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद तमाम जनतेने घ्यावी.

कळावे,

अलिबाग,
दिनांक / १० / २०२५

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता गुरूदत्त सोसायटी,
कन्याशाळेच्या बाजूला,
गाळा नं.२ ता. अलिबाग
जि. रायगड ४०२२०१

**नमुना एन.डी.**
**(नियम:९२(३) पहा)**
**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयांच्या नोटीशीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र MH/46/CC/Auto/2018/3004 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46-Az-5577

मालक श्री/श्रीमती कै. नितीन हिरु नाईक
यांचे तारीख ०८-मे-२०२३ रोजी निधन झालेले आहे
मी. श्री/श्रीमती निकीता नितीन नाईक

पत्ता मु. भिवपुरी रोड, रेल्वे स्टेशन, गणेश मंदिराच्या जवळ, चिंचवली, ता-कर्जत, रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल, रायगड च्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल रायगड च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव श्रीमती निकिता नितीन नाईक**
पत्ता मु. भिवपुरी रोड रेल्वे स्टेशन, गणेश
मंदिराच्या जवळ, चिंचवली,
ता-कर्जत, जि- रायगड पिनकोड - ४१०२०१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. उल्हास नरहर फाटक, २) श्रीमती मिना उल्हास फाटक दोघेही रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे टेकाळी, ता.अलिबाग, येथील गट क्र.व उपविभाग ४७५/१/ब क्षेत्र २.८०.०० आर.चौ.मी., आकार २८.०० रु. पैसे ही मिळकत व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत झिराड घर क्र.७७१ क्षेत्र २८७२ चौ. फुट

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास, अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि.०८-१०-२०२५.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

# युवकांचे मानसिक आरोग्य – एक आव्हान

भारतीय समाजात मानसिक आरोग्य ही संकल्पना परदेशातून आलेली नवी गोष्ट आहे, असे अनेकांचे मत आहे. खरं तर हजारो वर्षांपासून भारतात मनः शांती आणि मानसिक संतुलन या गोष्टी धार्मिक-सांस्कृतिक परंपरांमधून सतत चिंतनात होत्या. योग, ध्यान, साधना, भजन-कीर्तन, सण-समारंभ आणि कौटुंबिक सखोल जवळीक ही मानसिक आरोग्य टिकवण्याची नैसर्गिक साधने होती. ''मानसिक आरोग्य'' (Mental Health) असा वेगळा शब्द किंवा Depression-Anxiety (नैराश्य-उत्कंठा) अशा वैद्यकीय संज्ञा सामान्य लोकांच्या जीवनात नव्हत्या.

समस्या आल्यास लोक आध्यात्मिक मार्ग, सामुदायिक आधार किंवा कुटुंबाच्या पाठिंब्याने त्यांचा सामना करत. त्यामुळेच अनेकांच्या मते मानसिक आरोग्याची संज्ञा भारतात मोठ्या प्रमाणावर गेल्या काही दशकातच आली आहे, विशेषतः जागतिक औषध कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या बाजारपेठेच्या प्रयत्नातून १९८०-९० च्या दशकात पाश्चात्य देशांत नैराश्यविरोधी औषधांचा (ॲण्टी-डिप्रेसन्ट) मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आणि हळूहळू ही औषधे भारतातही आली. काही लोकांचा आरोप आहे की भीतीचं विक्रीकरण (मार्केटिंग) करून ही औषधे विकली गेली आणि ''ताण, नैराश्य, चिंता'' यांना कृत्रिमरीत्या वैद्यकीय स्वरूप दिलं गेलं. हा दृष्टिकोन पूर्णपणे चुकीचा नसला तरी तो एकांगी आहे. कारण दुसऱ्या बाजूला आज भारतात विशेषतः तरुणाईमध्ये मानसिक ताणतणाव वाढल्याचं आकडेवारीतून स्पष्ट होतं. नोकरीतील तरुणाईला आजच्या स्पर्धात्मक वातावरणामुळे प्रचंड ताण सहन करावा लागतो. असमतोल कामाच्या तासांबरोबरच करिअरमधील अनिश्चितता, कामाचा ताण, तसेच कौटुंबिक आणि सामाजिक अपेक्षा यांचा दबाव त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करतो. बेरोजगार तरुणाईसुद्धा अपयशाची भीती, आर्थिक ताण, आणि समाजातील अपेक्षा यामुळे नैराश्य आणि चिंता अनुभवतात. महिलांमध्येही मानसिक आरोग्याच्या समस्या वेगळ्या आहेत; घरकाम, मुलांची काळजी, करिअर, समाजातील भूमिका या सगळ्या गोष्टींचा ताण त्यांच्यावर असतो.



नॅशनल मेंटल हेल्थ सर्व्हे (निम्हान्स, २०१५-१६) नुसार १८-२९ वयोगटातील सुमारे ७-९% तरुणांना मानसिक विकार आयुष्यभरात कधीतरी आलेले आहेत. युनिसेफ सर्व्हे (२०२२) नुसार १५-२४ वयोगटातील १४ टक्के तरुणांनी 'नैराश्य किंवा काही करण्याची इच्छा नसणे' अशी लक्षणं व्यक्त केली. एनसीईआरटीच्या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांमध्ये उत्कंठा (ॲन्क्झायटी) ११ टक्के, अतितीव्र भावना १४ टक्के, आणि मनःस्थितीतील सतत बदल (मूड स्विंग्स) जवळपास ४३ टक्के आढळले. कार्यस्थळावरील अहवालांनुसार १८-२४ वयोगटातील सर्वाधिक तरुणांनी स्वत:चे मानसिक आरोग्य बिघडलेले किंवा संघर्ष करत आहे असे वर्णन केले. एनसीआरबी २०२२ च्या अहवालानुसार १८-३० वयोगटात आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे आणि त्यामागे शिक्षण, करिअर, नोकरी, प्रेमसंबंधातील अपयश यासारखी कारणं सापडतात. त्यावरून हे स्पष्ट होतं की मानसिक आरोग्य नाकारणं धोकादायक आहे.



**संदीप जयश्री नरेश जगे**
सीनियर मॅनेजर –आरडीसीसी बँक

समाजात अजूनही मानसिक आरोग्याबद्दल कलंक आहे. ''मनाचे आजार म्हणजे वेडेपणा'' ही चुकीची धारणा तरुणांना मदत घेण्यापासून रोखते. तसेच, सोशल मिडिया ने परिस्थिती अधिक तीव्र केली आहे. सततची तुलना, लाइक्स-फॉलोजची धडपड, सायबर-छळवणूक (सायबर बुलींग) आणि फोमो (फिअर ऑफ मिसिंग आऊट) यामुळे उत्कंठा व नैराश्य वाढलं आहे. जीवनशैलीतील बदल, जंक फूड, बसून राहण्याची पद्धत (सेडेण्टरी लाइफस्टाइल), एकाकीपणा, सततच्या स्क्रीन वापरामुळे तरुणांचे मन-शरीर दोन्ही प्रभावित होत आहे.

ग्रामीण भागात मानसिक आरोग्याच्या समस्या कमी नोंदवल्या जातात कारण तिथे तपासणीची कमी साधनं आहेत. शहरी भागात जागरूकता आहे, पण तरीही अनेकदा स्व-औषधोपचार (सेल्फ मेडिकेशन) किंवा ऑनलाईन सल्ले यावर भर दिला जातो. शिक्षण आणि रोजगाराच्या दडपणामुळे तरुणांच्या मनावर प्रचंड ताण आहे. आयआयटी-जेईई, नीट, यूपीएससी सारख्या स्पर्धा, नोकरीसाठीची अनिश्चितता आणि ''करिअर फेल्युअर म्हणजे लाइफ फेल्युअर'' अशी भीती यामुळे मानसिक असुरक्षितता वाढली आहे.

या सगळ्या ताणातून मुक्त होण्यासाठी खेळ, वाचन आणि सर्जनशील उपक्रम खूप महत्त्वाचे ठरतात. नियमित शारीरिक खेळ, योग आणि प्राणायाम केवळ शरीरच नव्हे तर मनही ताजेतवाने करतात. वाचनाची सवय, कला, संगीत यांसारखे उपक्रम तरुण मनाला स्थैर्य देतात, विचारशक्ती वाढवतात आणि ताण कमी करतात. याशिवाय, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, सोशल मिडिया आणि सततच्या स्क्रीन पासून काही वेळ दूर राहिल्याने मानसिक ताण आणि अस्वस्थता कमी होते, मन शांत राहते आणि नीट झोप येते. या उपायांमुळे तरुणाईची मानसिक क्षमता वाढते आणि त्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास तयारी होते. तरीही भारताची ताकद मोठी आहे. योग, प्राणायाम, ध्यान, आयुर्वेद, भजन-कीर्तन यांचा मानसिक आरोग्यावर उत्तम परिणाम होतो हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. भारतीय समाजात सांस्कृतिक व धार्मिक आधार (आध्यात्मिक सहनशक्ती) खूप मजबूत आहे, जो पाश्चात्य समाजात तुलनेने कमी आहे. परंतु या पारंपरिक साधनांचा आधुनिक विज्ञानासोबत समन्वय करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात मानसिक आरोग्याच्या समस्या कमी नोंदवल्या जातात कारण कलंक आणि तपासणीची कमी साधने आहेत. शहरी भागात जागरूकता आहे, पण तरीही अनेकदा स्व-औषधोपचार किंवा ऑनलाईन सल्ले यावर भर दिला जातो.या परिस्थितीत धोरणात्मक उपायांची गरज आहे.

शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशकांची नेमणूक, मानसिक आरोग्य हेल्पलाईन (जसे की किरण हेल्पलाईन) यांचा प्रसार, आणि कंपन्यांमध्ये कर्मचारी सहाय्य कार्यक्रम (एम्प्लॉयी असिस्टन्स प्रोग्रॅम्स) प्रभावीपणे लागू करणे आवश्यक आहे. लायन्स क्लब सारख्या संस्था याचे स्थानिक उदाहरण म्हणून समोर आली आहे.

शेवटी, मानसिक आरोग्य हा भारतात परदेशातून आलेला शब्द असू शकतो, पण त्यामागील खरी समस्या नाकारता येत नाही. भारतीय समाजाची ताकद-कुटुंब, संस्कृती, योग-ध्यान, अध्यात्म - आणि आधुनिक उपाय समुपदेशन, उपचार, गरजेनुसार औषधे यांचा मध्यम मार्ग स्वीकारणे हीच खरी गरज आहे.

शेवटी, समर्थ रामदास स्वामींच्या ''मना कल्पना कल्पता कल्पकोटी, नव्हे रे - नव्हे सर्वथा रामभेटी'' या श्लोकाप्रमाणे, तरुणाईसाठी खऱ्या मानसिक आरोग्याचा आधार म्हणजे मनाचं शुद्धीकरण, स्थिरता आणि सकारात्मक एकाग्रता. बाह्य ताणतणाव, सामाजिक अपेक्षा किंवा सततच्या कल्पनांवर अवलंबून राहून समाधान सापडत नाही; खरं सामर्थ्य आणि शांती आपल्या मनातच निर्माण होते.

म्हणूनच, आजच्या आधुनिक जीवनशैलीतही, योग, ध्यान, खेळ, वाचन आणि सांस्कृतिक-सामाजिक आधार यांचा उपयोग करून मनाला सज्जन आणि केंद्रित ठेवणे - हेच खरे समाधान आणि तरुणाईच्या सामर्थ्याची खरी गरज ठरते अन्यथा उन्हातून घरी आलेल्या माणसाला गूळ-पाणी आणि साखरपाणी देणाऱ्या समाजात डायबेटीसच्या गोळ्या जशा विकल्या गेल्या तसेच भविष्यात मानसिक आजाराच्या गोळ्या विकण्यासाठी नवीन बाजारपेठ तयार होत आहेच.

## निवडक

### 'कबड्डी संघटनेची निवडणूक घ्या'

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनची निवडणूक चार महिन्यांत घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने निवडणूक अधिकारी यांना दिले आहेत. तसेच न्यायालयाने निवृत्त न्या. पृथ्वीराज चव्हाण यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. गेल्या वर्षी असोसिएशनची निवडणूक जाहीर झाली. ही निवडणूक राष्ट्रीय क्रीडा संहितेनुसार व्हावी, अशी मागणी करत सातारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनने ॲड. वैभव गायकवाड व रफिक सय्यद यांच्या मार्फत याचिका दाखल केली. न्या. महेश सोनक व न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने सविस्तर सुनावणी घेऊन राष्ट्रीय क्रीडा संहितेनुसारच निवडणूक घेण्याची सक्त ताकीद दिली. चार महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण करा, असेही न्यायालयाने बजावले आहे. या निवडणुकीसाठी ७० वर्षे वयाची अट ठेवण्यात आली आहे.

### दसऱ्याला क्रिकेट पर्वाचा शुभारंभ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सिनीयर क्रिकेट क्लब पनवेल आणि अर्ली मार्निंग क्लब, चिंचपाडा या संघांच्या क्रिकेट पर्वाचा शुभारंभ दसऱ्याला गुरुवारी (दि.२) ऑक्टोबर रोजी सिनीयर क्रिकेट क्लब, पनवेलचे कर्णधार महेंद्र घरत यांच्या हस्ते झाला. यावेळी



दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांना हस्तांदोलन करून क्रिकेट पर्वाचा आनंद घेतला. प्रत्येक शनिवारी आणि रविवारी बहुतांश वेळा घरत पनवेल महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी आठला क्रिकेट खेळण्यासाठी हजर असतात. अपवाद असतो ते विदेशात दौऱ्यावर असल्यास, काटेकोर वेळेचे व्यवस्थापन करण्यात घरत यांचा हातखंडा आहे.

# विदर्भने पटकावला इराणी कप

## शेष भारताचा ९३ धावांनी पराभव; स्पर्धेवर तिसऱ्यांदा कोरलं नाव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

इराणी कप २०२५-२६ स्पर्धेत रणजी चॅम्पियन विदर्भ आणि शेष भारता हे संघ आमनेसामने आले होते. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानात हा सामना पार पडला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल विदर्भाच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजी स्वीकारली. पहिल्या डावात ३४२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना विदर्भने २१४ धावा केल्या. यासह विदर्भने पहिल्या डावात १२८ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात विदर्भने २३२ धावा केल्या. पहिल्या डावातील आघाडी मिळून ३६० धावांचे आव्हान दिले. पण शेष



भारत दुसऱ्या डावात फक्त २६७ धावाच करू शकली. विदर्भने या सामन्यात ९३ धावांनी विजय मिळवला. विदर्भने तिसऱ्यांदा जेतेपदावर नाव कोरले आहे. यापूर्वी २०१७-१८ आणि २०१८-१९ मध्ये जेतेपद मिळवले होते.

पहिल्या डावात विदर्भकडून अथर्व तायडेने १४३ दावांची खेळी केली होती. तसेच मधल्या फळीत यश राठोडने ९१ धावा केल्या. या दोघांच्या खेळीमुळे विदर्भने पहिल्या डावात ३४२ धावांपर्यंत मजल मारली. शेष भारताकडून पहिल्या डावात मानव सुथार आणि आकाश दीपने प्रत्येकी ३ विकेट काढल्या, तर सारांश जैनला २ विकेट मिळाल्या. तसेच अंशुल कंबोज आणि गुरनूर ब्रारने प्रत्येकी एक विकेट घेतली. पहिल्या डावात शेष भारताकडून अभिमन्यू ईश्वरन आणि रजत पाटीदार वगळता एकही फलंदाज साजेशी कामगिरी करू शकला नाही. विदर्भकडून यश ठाकुरने सर्वाधिक ४ विकेट काढल्या. तर हर्ष दुबे २, पार्थ रेखाडे २, आदित्य ठाकरे १ आणि दर्शन नायंकडे १ गडी बाद केला.

दुसऱ्या डावात विदर्भकडून फार काही चांगली खेळी झाली नाही. पण प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले.

अमन मोखाडेने ३७, आकाश वाडकरने ३६, दर्शन नायकांडेने ३५ धावा केल्या. शेष भारताकडून अंशुल कंबोजने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या. तर सारांश जैनने २, गुरनूर ब्रारने २ आणि मानव सुथारने २ गडी बाद केले. विजयासाठी मिळालेल्या ३६० धावांचा पाठलाग करताना शेष भारताला धक्के बसले. मधल्या फळीत फक्त यश धूलने ९२, तर मानव सुथारने ५६ धावांची खेळी केली. याशिवाय मोठी कामगिरी करण्यात अपयश आले. विदर्भकडून हर्ष दुबेने ४, आदित्य ठाकरेने २, यश ठाकुरने २, पार्थ रेखाडेने १ आणि दर्शन नाइकंडेने १ विकेट घेतली.

### विदर्भाने ठेवले मोठे लक्ष्य

**पहिल्या डावात आघाडी घेतल्यानंतर, दुसऱ्या डावातही विदर्भने शानदार कामगिरी केली. त्यांनी दुसऱ्या डावात एकूण २३२ धावा केल्या, ज्यामुळे शेष भारताला विजयासाठी ३६१ धावांचे लक्ष्य मिळाले. मात्र शेष भारत २३७ धावांवर बाद झाला. या डावातही हर्ष दुबेनं चार बळी घेतले, तर यश ठाकूर आणि आदित्य ठाकरे यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. या दमदार कामगिरीमुळं विदर्भ संघ सामना जिंकण्यात यशस्वी झाला.**

# टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ पनवेल व नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन शनिवार ११ ते रविवार १२ ऑक्टोबर रोजी सिडको समाज मंदिर दुसरा मजला सेक्टर १८ नवीन पनवेल येथे महाराष्ट्र संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेत मती मंद व दिव्यांग खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेचे उद्घाटन शनिवार (दि. ११) ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते होणार आहे.

सदर प्रसंगी लान्स क्लब पनवेलच्या सुरभी पेंडसे, संजय पोद्दार, अशोक गिल्डा, मधुकर भगत,राजेंद्र जेसवानी, नागेश देशमाने, नंदकिशोर धोत्रे, मदन गोवारी, के. एस. पाटील, मनोज म्हात्रे, मीना पोद्दार, ज्योती देशमाने, भावना जेसवानी, शोभा गिल्डा, अनिका अमीत पोद्दार, लिओ लुमीना, आरुषी गोडबोले तसेच अनेक लायन व लिओ सभासद मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

### कोको उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली :** गतविजेत्या कोको गॉफने ईव्हा लिसला पराभूत करून चायना ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. सलग तिसऱ्या वर्षी उपांत्य फेरी गाठण्यात यश मिळवले.

कोको सुरुवातीला अडचणीत सापडली, मात्र या संधीचा फायदा घेण्यात ईव्हाला अपयश आले. जर्मनीच्या लिसला उपांत्य फेरीत गॉफसमोर अनिसिमोवा किंवा इटलीच्या जॅस्मिनचे आव्हान असणार आहे.

विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत

# समृद्धी लोभी ठरली अव्वल



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा शालेय क्रीडा स्पर्धा सुरु असून विभागीय कुस्ती स्पर्धेत कर्जत तालुक्यातील बीड गावातील समृद्धी शिवाजी लोभी हिने कमाल केली असून तिने ७९ किलो वजनी गटात विजेतेपद मिळविले आहे. जिल्हा क्रीडा परिषद रायगड व जिल्हाधिकारी कार्यालय रायगड आणि नवी पोलीस मुख्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने मुंबई विभाग अंतर्गत शाळेत कुस्ती स्पर्धा आयोजित केली होती.

रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा पोलीस मुख्यालय रोडपाली कळंबोली येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील अनेक शाळांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला होता. पोलीस मुख्यालय पनवेल येथे संपन्न झालेल्या क्रीडा स्पर्धामध्ये कुस्ती मध्ये कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा बीड या शाळेतील विद्यार्थिनी समृद्धी शिवाजी लोभी हिने ७९ वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. रायगड जिल्हा परिषद शाळा बीड येथील विद्यार्थीनींने प्रथम क्रमांक मिळवत रायगडमध्ये तिची प्रशंसा होत आहे.

शाळेतील शिक्षकांचेही अभिनंदन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गडकरी, डी. बी.म्हात्रे, शंकर भुसारी, दीपक लोभी, संदीप रुठे, प्रकाश लोभी, अनिल लोभी आदी उपस्थित होते.

### ■ ७९ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक

४०० पेक्षा धावा काढून सर्वांचे लक्ष वेधले | कुचबिहार एकदिवसीय स्पर्धेत होणार सहभागी

# आर्यनची महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाचा कर्णधार व चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाचा धडाकेबाज डावखुरा फलंदाज आर्यन जितेंद्र देशमुख याची महाराष्ट्राच्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आपला एकोणीस वर्षाखालील मुलांचा अंतिम पंधरा खेळाडूंचा संघ जाहीर केला त्यात आर्यनचा समावेश करण्यात आला आहे. निवडलेला संघ बीसीसीआयच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कुचबिहार एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार असून महाराष्ट्राचा संघ रांची येथे रवाना होईल.

गतवर्षी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले असल्याने जिल्ह्यातील होतकरू गुणवान खेळाडूंना स्पर्धा सामने खेळण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने खेळाडूंना त्याचा मोठा फायदा झाला व जास्तीतजास्त सामने खेळण्याची संधी मिळाली असल्याचे आर्यननी सांगितले.

आर्यनचा एकोणीस वर्षाखालील मुलांच्या संघाचा कर्णधार असून त्याची निवड रायगडच्या वरिष्ठ गटाच्या संघात सुद्धा गतवर्षी करण्यात आली होती. एमसीएच्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत आर्यनची उत्तम कामगिरी केली होती त्यानंतर त्याचा समावेश निवड चाचणी शिबिरासाठी करण्यात आला. निवड चाचणीतील सामन्यात आर्यनने ४०० पेक्षा जास्ती धावा काढून सर्वांचे लक्ष वेधले होते. आर्यनची निवड झाल्याने जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांनी आनंद व्यक्त केला असून महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात रायगड जिल्ह्यातील खेळाडूंची निवड होत असल्याने इतर खेळाडूंना सुद्धा ह्यातून प्रेरणा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये चांगल्या दर्जाची गुणवता आहे फक्त त्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रोत्साहन व क्रिकेट खेळण्यासाठी व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने येणाऱ्या क्रिकेट हंगामासाठी विविध वयोगटातील मुला- मुलींसाठी जास्तीत-जास्त स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे व टॅलेंट हंट सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. आर्यनची निवड महाराष्ट्राच्या संघात झाल्याबद्दल रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींनी त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

> **आपल्या निवडी बाबत अत्यंत आनंद झाल्याचे सांगितले. आपल्या यशात आपल्या पालकांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी व्यक्त केले. आपले वडील जितेंद्र देशमुख हे स्वतः आपल्याला प्रशिक्षण देत आहेत तसेच चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आकाश पटारिया,सुनील सरगर व रोशन अडे यांनी सुद्धा आपल्याला वेळोवेळी चांगले व्यासपीठ व प्रशिक्षण दिले असल्याचे त्यांनी सांगितले.**
> **–आर्यन देशमुख**



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)